# आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

मंगळवार, १८ एप्रिल २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी • दैनिक
वर्ष - ०२ • अंक -२२४
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

• MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) • TUESDAY 18 APRIL 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | • YEAR-02 • ISSUE-224 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-5



राजस्थानी मल्टीस्टेट
कार्यक्षेत्र महाराष्ट्र-कर्नाटक

**राजस्थानी मल्टीस्टेट**
**को-ऑप. क्रेडीट सो.लि., परळी वैजनाथ**
बँकींग • आरोग्य • शिक्षण • रियल ईस्टेट • इन्शुरन्स
मुख्य कार्यालय : मोंढा, परळी वैजनाथ, जि. बीड. मो. 9130072178, 9130072188 | कॉर्पोरेट ऑफिस : २०५,२०६, बिल्डिंग नं. २, पहिला मजला, अपना बाजार, जालना रोड, औरंगाबाद . मो. 9130072176,
टोल-फ्री : 18004197501 rajasthanimultistate.in | संपर्क अनंत भाग्यवंत ९१३००७२१८९



चंदुलाल बियाणी
संस्थापक अध्यक्ष

Rajasthani Multistate MINI BANKING
www.rajasthanimultistate.in
Powered by Tatkal Banking

आता बँकिंग व्यवहार करणे झाले सोपे... राजस्थानी मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सो.लि.,चा तात्काळ बँकिंगच्या माध्यमातून तब्बल ४१८ बँकांशी होणार सेकंदात व्यवहार...

कोणतेही बँकिंग व्यवहार करणे फक्त 9 सेकंदात शक्य

**तात्काळ बँकिंग सुविधा**

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया मान्यताप्राप्त, NPCI द्वारे संचलित भारत बिल पेमेंट सिस्टम (BBPS), मोबाईल/डी.टी.एच. रिचार्ज आणि इतर सुविधा
* नियम व अटी लागू


कोणत्याही बँकेत पैसे डिपॉझिट करणे. | कोणत्याही बँकेत पैसे ट्रान्सफर करणे. | कोणत्याही बँकेतून पैसे काढणे | मोबाईल बँकिंग सुविधा | Bank Account Verification सुविधा | NEFT/RTGS सुविधा | IMPS/UPI सुविधा | आधार पेमेंट सुविधा | QR Code सुविधा


# धर्मांतराविरोधात भागवत आक्रमक!

## धोकेबाज लोकांपासून सावध रहा

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत हे धर्मांतराच्या विरोधात आक्रमक झाले आहेत. जेव्हा लोकांना हे वाटू लागते की समाज आपल्या सोबत नाही तेव्हा मिशनरी त्या परिस्थितीचा फायदा उचलतात असे मोहन भागवत यांनी म्हटले आहे. गोविंदनाथ महाराज समाधी उत्सव होता त्यावेळी झालेल्या मोहन भागवत यांनी हे वक्तव्य केले आहे.**



अनेक लोक सोयी, सुविधांपासून वंचित असतात. तेव्हा आपले लोक अशा लोकांच्या जवळ जात नाहीत. मात्र हजारो मैलांवरून आलेले काही मिशनरी या ठिकाणी येतात. त्यांच्यासाठी काही सोयी सुविधा करतात, त्यांना भोजन देतात. त्यांची भाषा बोलतात. त्यानंतर त्यांना हळू हळू धर्मांतराकडे वळवतात. १०० वर्षांपूर्वी काही लोक सगळे काही बदलण्यासाठी भारतात आले. धर्मांतराचे प्रयत्न गेल्या अनेक वर्षांपासून सुरू आहेत. मात्र आपल्या संस्कृतीशी आपल्या पूर्वजांशी असलेली आपली नाळ ही घट्ट जोडली गेली आहे. ही नाळ तोडण्याचा प्रयत्न अशा लोकांकडून केला जातो. असे मोहन भागवत यांनी म्हटलं आहे.

धोकेबाज लोकांपासून आपण सावध राहिले पाहिजे. लोकांचा विश्वास आपल्या धर्मावरून उडावा या अनुषंगाने काही प्रश्न हे असले लोक विचारतात. समाजात अनेक लोक असे असतात ज्यांना वाटते की आपली कदर आपल्या समाजाला नाही. अशा लोकांनाच हे मिशनरी हेरतात आणि त्यांना धर्मांतराकडे वळवतात. अशा धोकेबाज लोकांपासून सावध राहिले पाहिजे. लोकांच्या मनात आपल्याच लोकांविषयी शंका उत्पन्न होते हे कसे रोखता येईल? यावर आपण सगळ्यांनीच लक्ष केंद्रीत केले पाहिजे. असेही मोहन भागवत यांनी म्हटले आहे. भारताची ताकद जगभरात वाढते आहे ही आनंदाची आणि समाधानाची बाब आहे. मात्र आपल्याला हिंदू धर्म वाचवायचा आहे. आपण एक संयुक्त समाज म्हणून ओळखले जात होतो. मात्र नंतर आपणच जाती आणि वर्ग व्यवस्था आणली त्यामुळे आपल्या समाजातच मतभेदांच्या भिंती उभ्या राहिल्या. याचा फायदा बाहेरच्या देशातले लोक घेऊ लागले. आपल्यातले मतभेद कसे वाढतील आणि आपण धर्माच्या नावावर कसे विभागले जाऊ हे काम मिशनऱ्यांनी सोयीस्कररित्या केले असेही मोहन भागवत यांनी म्हटले आहे. त्यामुळे आपल्याला आपली एकजूट कायम ठेवावी लागेल असेही मोहन भागवत यांनी म्हटले आहे.

# महाराष्ट्र भूषण सोहळ्यावर कन्हैया कुमारचे टीकास्त्र!

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्य सरकारकडून रविवारी ज्येष्ठ निरुपणकार आप्पासाहेब धर्माधिकारी यांचा महाराष्ट्र भूषण पुरस्काराने सन्मान करण्यात आला. मात्र, याच सोहळ्यात उष्माघाताच्या त्रासाने तब्बल ११ जणांना आपले प्राण गमवावे लागले असून अजूनही अनेकजण रुग्णालयात उपचार घेत आहेत. या पार्श्वभूमीवर राजकीय वर्तुळात तीव्र पडसाद उमटू लागले आहेत. विरोधकांनी सरकारवर परखड शब्दांत हल्लाबोल केला आहे. यासंदर्भात काँग्रेस नेते कन्हैया कुमार यांनी महाराष्ट्र सरकारच्या धोरणावर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे.

महाराष्ट्रात सरकारच्या उपस्थितीत, सरकारी कार्यक्रमात सरकारच्या बेजबाबदारपणामुळे ११ लोकांचा मृत्यू झाला आहे. आम्ही मागणी करतो की सरकारने कोणतेही कारण न देता याची जबाबदारी घ्यावी आणि काही प्रश्नांची उत्तरे द्यावी, असे म्हणत कन्हैया कुमार यांनी सरकारला जाब विचारला आहे. तिथे एक सरकारी कार्यक्रम केला जात होता आणि सरकारचे अनेक मोठे अधिकारी व मंत्री तिथे उपस्थित होते. मग एवढी मोठी चूक कशी झाली? तुम्ही एखाद्या कंपनीला कार्यक्रमाच्या तयारीसाठी १३ कोटींचं कंत्राट देता. मग जर नेत्यासाठी तंबू किंवा मंडप लागू शकतो, कूलर, एसी लागू शकतो तर मग जनतेसाठी का नाही लागू शकत?

# प्रकाश आंबेडकर कधीपासून भविष्य सांगणारे झाले?

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** वंचित बहुजन विकास आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी रविवारी पुण्यात माध्यमांशी बोलताना महाराष्ट्राच्या राजकारणाबाबत खळबळजनक दावा केला होता. 'येत्या १५ दिवसांत राज्यात दोन ठिकाणी मोठे राजकीय बॉम्बस्फोट होतील, असे ते म्हणाले होते. त्यांच्या या दाव्यानंतर विविध राजकीय चर्चाही रंगू लागल्या. दरम्यान, यावरून आता काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी प्रकाश आंबेडकरांना टोला लगावला आहे. नाना पटोले आज एका कार्यक्रमानिमित्त पुणे दौऱ्यावर होते. त्यानंतर त्यांनी टीव्ही ९ वृत्तवाहिनीशी संवाद साधला. यावेळी त्यांना प्रकाश आंबेडकरांच्या दाव्याबाबत विचारण्यात आले असता, प्रकाश आंबेडकर कधीपासून भविष्य सांगणारे झाले, मला माहिती नाही, असा टोला त्यांना लगावला.

तसेच आंबेडकरांनी राज्यात दोन राजकीय स्फोट होणार असल्याचं म्हटलं आहे. त्यामुळे हे स्फोट नेमके कुठं होतात, ते बघू, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली. प्रकाश आंबेडकर रविवारी पुण्यात माध्यमांशी संवाद साधताना राज्याच्या राजकारणाबाबत मोठा दावा केला होता. येत्या १५ दिवसांत महाराष्ट्रात मोठे राजकारण बघायला मिळेल. दोन ठिकाणी मोठे राजकीय स्फोट होणार आहेत. त्यामुळे आपण १५ दिवस वाट बघुया, असे ते म्हणाले होते. तसेच राज्यातील सरकार पडणार का? असे विचारले असता, येत्या १५ दिवसांत सर्वांना सर्वकाही समजेल, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली होती.

# मुंबई मेट्रोरेल प्राधिकरणाला कोर्टाने ठोठावला 10 लाखांचा दंड

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** आरे जंगलातील वृक्षतोडीवरून आज सुप्रीम कोर्टाने आपला संताप व्यक्त केला. केवळ 84 झाडं तोडण्याची परवानगी दिलेली असताना 177 झाडं तोडायची परवानगी मागताच कशी? असा सवाल सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी केला. सुप्रीम कोर्टाच्या खंडपीठाने कोर्टाच्या आदेशाची अवमानना केल्याप्रकरणी मुंबई मेट्रो प्राधिकरणाला झापलं. सुप्रीम कोर्टाने मुंबई मेट्रोला 177 झाडं तोडण्याची परवानगी देताना 10 लाखांचा दंड ठोठावला. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, न्या. पी.एस. नरसिंहा आणि न्या. जे. बी. पराडीवाला यांच्या खंडपीठासमोर वृक्षतोडीबाबत जनहित याचिकेवर सुनावणी झाली. मुंबई मेट्रो प्राधिकरणाने मुख्य वनसंरक्षकांकडे दंडाची 10 लाख रुपयांची रक्कम जमा करावी असे निर्देश दिले. वनसंरक्षकांनी मेट्रो प्राधिकरणांने वनीकरण झाले का, यावर लक्ष ठेवावे आणि पाहणी करावी असेही निर्देश सुप्रीम कोर्टाने दिले.



मुंबई मेट्रो प्राधिकरणाला याआधी 84 झाडे तोडण्याची परवानगी सुप्रीम कोर्टाकडून देण्यात आली होती. त्यानंतर उद्यान अधीक्षक आणि वृक्ष अधिकारी यांनी सुप्रीम कोर्टाच्या आदेशाचे उल्लंघन करत 177 झाडे तोडण्यास मंजुरी दिली. त्यावरून सुप्रीम कोर्टाने प्रचंड नाराजी व्यक्त केली.

# केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या पगारात होणार भरघोस वाढ


आधुनिक केसरी न्यूज

मुंबई : सरकार केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या पगारात मोठी वाढ करणार आहे. सरकार काही दिवसातच कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात आणखी चार टक्क्यांनी वाढ करणार असल्याची चर्चा आहे. ही वाढ केल्यानंतर कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता 46 टक्क्यांपर्यंत होणार आहे. केंद्र सरकारच्या या निर्णयाचा फायदा केंद्रीय कर्मचारी आणि पेन्शनधारकांना होणार आहे. सरकारने जानेवारी ते जून 2023 च्या पहिल्या सहामाहीत महागाई भत्त्यामध्ये चार टक्क्यांनी वाढ केली होती. यानंतर डीए 38 टक्क्यांवरून 42 टक्के झाला आहे. सरकार दर सहा महिन्यांनी कर्मचाऱ्यांचा महागाई भत्त्यामध्ये वाढ करते. त्यामुळे यंदा चार टक्क्यांनी वाढ झाल्यास डीए 46 टक्क्यांवर पोहोचेल, असा अंदाज आहे. कर्मचारी आणि पेन्शनधारकांसाठी महागाई भत्ता दर महिन्याला कामगार ब्युरोने जारी केलेल्या औद्योगिक कामगारांसाठी (CPI-IW) ग्राहक किंमत निर्देशांकाच्या आधारे मोजला जातो. लेबर ब्युरो कामगार मंत्रालयाचा हा एक भाग आहे. कंन्ज्युमर प्राईस इंडेक्स (CPI-IW) च्या आधारावर याचे कॅलक्युलेशन होते.

जर केंद्रीय कर्मचाऱ्यांचा डीए 46 झाला तर त्यांच्या पगारात मोठी वाढ होणार आहे. समजा केंद्रीय कर्मचाऱ्यांचा बेसिक पे 18,000 रुपये आहे. 42 टक्क्याच्या हिशोबाने डीए 7560 रुपये होत आहे. जर 46 टक्के वाढ झाली तर पगारात 8280 रुपयांची वाढ होणार आहे. म्हणजे पगारात दरमहा 720 रुपयांनी वाढ होणार आहे. सरकारने 2022 च्या दुसऱ्या सहामाहीत डीएमध्ये चार टक्क्यांनी वाढ केली होती. त्यामुळे यंदाही एवढी वाढ अपेक्षित आहे. मात्र, याबाबत सरकारकडून अद्याप कोणतेही अधिकृत निवेदन जारी करण्यात आलेले नाही.

**17 टक्क्यांवरून 42 टक्क्यांपर्यंत वाढवला डीए**

जुलै 2021 मध्ये केंद्र सरकारने केंद्रीय कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता 17 टक्क्यांवरून 28 टक्क्यांपर्यंत वाढवला होता. यानंतर, ऑक्टोबर 2021 मध्ये आणखी 3 टक्के वाढ देऊन ते 31 टक्के करण्यात आले. सरकारने मार्च 2022 मध्ये कर्मचाऱ्यांच्या डीएमध्ये तीन टक्क्यांनी वाढ केली होती. त्यानंतर महागाई भत्ता 34 टक्क्यांवर गेला. त्यानंतर चार टक्क्यांनी वाढ करण्यात आली.





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

# रामका गुणगान करिये

पं. भीमसेन जोशी आणि लता मंगेशकर या दोन भारतरत्नांनी गायिलेले ' गुणगान करिये रामका ' हे अतिशय सुंदर गीत. हे गीत ऐकताना जणू समाधी लागते. तशी रामाची कुठलीही गाणी गोडच ! मग ते गीतरामायण असो वा अन्य कुठलीही गाणी. मुळात रामायणच गोड ! पेढ्याचा कुठलाही भाग खाल्ला तरी तो गोडच लागणार ना ! तशीच अवीट गोडीची ही रामकथा. या रामकथेने हजारो वर्षांपासून अनेकांना प्रेरणा दिली. शेकडो लेखक आणि हजारो कवी लिहिते झाले. पण रामकथेची थोरवी संपली का ? वर्णन करून झाली का ? ती कधीच संपणार नाही. रामकथा म्हणजे विविध डोळे दिपविणाऱ्या रत्नांनी भरलेला एक सागर आहे. जेवढी खोल बुडी माराल तेवढी रत्ने हाताला लागतील. समुद्राला आपण रत्नाकर म्हणतो. रामकथा सुद्धा या अर्थाने एक रत्नाकरच ! मी सुरुवातीला उल्लेख केलेल्या गीताचे सुरुवातीचे शब्द आहेत ' रामका गुणगान करिये.' रामाचं गुणगान कशाकरता करायचं ? आणि गुणगान केलं तरी कोणाचं जातं ? ज्याच्यात काही अलौकिक असे गुण आहेत, अशाच व्यक्तीचं आपण गुणगान करतो ना ! आपण रामाचं गुणगान करतो, कृष्णाचं गुणगान करतो, शिवाजी महाराजांचं गुणगान करतो, ते त्यांच्यात विशेष असे अलौकिक गुण आहेत म्हणून. आपण रावणाचं, कंसाचं, औरंगजेबाचं गुणगान करत नाही. आपण आपल्यासमोर असेच आदर्श ठेवतो की ज्यांच्यापासून आपल्याला काही शिकता येईल, प्रेरणा घेता येईल. आजच्या या लेखात प्रभू श्रीरामांचे असेच काही गुण आठवू या. त्या निमित्ताने त्यांचं गुणगान करू या. सुरुवातीला मला डोळ्यासमोर दिसतो तो, वसिष्ठांच्या आश्रमात शिकणारा राम. राम राजपुत्र असला तरी, आश्रमात तो एक वसिष्ठ ऋषींचा आज्ञाधारक शिष्य म्हणूनच वावरतो. इतर शिष्यांबरोबरच





## आनंदी पहाट

# विचार व वर्तन संस्कारक्षम असावेत

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

संस्कारच आपल्या अंतर्मनाला शिस्त लावत असतात. एक विशीष्ट आकार, दिशा आणि गती प्राप्त करून देत असतात. मुळातच ह्या विचाराची व्याप्ती आपण समजून घेणं सर्वप्रथम जरुरीचं असतं. आपल्या प्रत्येकाच्या जीवनांत आंतर्मानावरील संस्कार खूप महत्त्वपूर्ण असतात. आपल्या विचारांमध्ये परिपक्वता त्याशिवाय येतेच असं नाही. संस्काराशिवाय जीवनमूल्य शून्य ठरत असतं. संस्कारच आपल्याला श्रेष्ठ बनवत असतात, उत्तम आकार देत असतात.

आपल्या सर्वोत्तम जीवनाचा पाया उत्तम संस्कारांवरच अवलंबून असतो. संस्कारांशिवाय जीवन भरकटलेल्या जहाजांप्रमाणे, विमानाप्रमाणे असतं, एकप्रकारे विमनस्क अवस्थेतील मन कोणतीही पातळी गाठू शकतं. संस्कार म्हणजे नेमकं काय असतं ? खरं तर, संस्कार संस्कृतीनेच प्राप्त होत असतात. त्याचप्रमाणे, संस्कृती सुद्धा, संस्कारांवर निर्भर असते. दोन्ही एकमेकांवर आधारित असतात, असं म्हंटलं तर निश्चितच वावगं ठरणार नाही. संस्कार म्हणजे आपल्या अंतर्मनावर सामाजिकदृष्ट्या महत्वाच्या आणि उपयुक्त ठरतील अशा चांगल्या सवयी, असं म्हणता येईल. आपल्यामध्ये यासाठी आवश्यक ते सद्गुण असणं जरुरीचं असतं. अशा गुणांचा फक्त केवळ व्यक्तिगत लाभ होत नसतो, तर समाजातील प्रत्येक घटक लाभार्थी ठरत असतो. निरोगी, प्रगत समाज जीवनाकरिता उत्तम संस्कारित विचार असणं महत्वाचं ठरतं. एक आदर्श नागरिक निर्माण होण्याची सुरुवात घराघरातूनच व्हावी लागत असते, हे विसरून चालणार नाही. चांगल्या सवयीचं, संस्काराचं महत्त्व पटवून घेणं सद्यःस्थितीत आवश्यक आहे. आपल्या दिनचर्येतील नियमितता, आहारनियमांचं पूर्ण पालन, खाण्यापिण्यावर नियंत्रण, शुद्ध आणि सात्त्विक आहार ह्या सर्व गोष्टी मनावरील संस्कारासाठी पूरक असतात, म्हणूनच आपल्या जीवनाकरिता आवश्यक असतात. शारीरिक, मानसिक पातळीवर आपल्या मनावरील संस्काराच्या दृष्टीनं ह्या बाबी अत्यंत महत्वाच्या असतात. सामाजिक स्वास्थ्यासाठी देखील ह्या उपयुक्त ठरतात.



आधुनिक केसरी

**नाम मंत्र ज्याला | गवसला ||**

दाटावा उमाळा | अंतरी नामाचा ||
निष्काम कर्माचा | लळा लागो ||१||
यातनांचे बाड | वाहूनी थकलो ||
परि न चूकलो | कर्तव्यात ||२||
अभंगात गातो | मर्म जीवनाचे ||
वर्म आनंदाचे | जाणिले मी ||३||
नंदा घरी नांदे | ब्रह्मांडाचा धनी ||
सांगे ब्रह्म वाणी | कर्म थोर ||४||
भंगल्या यातना | पाहता विठ्ठला ||
नाम मंत्र ज्याला | गवसला ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी

**नेत्रे द्वे चापि कर्णौ द्वौ मस्तिष्कं त्वेकमेव हि। परं चिनोति तद् कुत्र विश्वसेद् मानवः खलु॥ माणसाला डोळे दोन असतात आणि कानही दोन असतात. मस्तिष्क मात्र एकच असते. पण मानवाने कोठे (कानांवर की डोळ्यांवर) विश्वास ठेवावा; हे मात्र तेच निश्चित करते.**




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

**दीन अधीन गरीब है, अहं वीपदा नाश ।
पटके मटुकी मान की, ता घट गुरु कर वास ।।२१ ।।(स्वर्वेद तृतीय मण्डल दशम अध्याय)
०३/१०/२१ मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**

दीन-अधीन गरीब होऊन सद्गुरूंना शरण गेल्यास अहंकार आणि विपदांचा नाश होतो. अहंकारामुळेच सर्व संकटांनी ग्रासून जीवाचे अधःपतन होते. त्यामुळेच अहंकाराने निर्माण झालेले मानाचे मडके डोक्यावरून उतरवून खाली फेकून दिल्याने त्या ठिकाणी सद्गुरूंचा निवास होतो. अभिमानी मध्ये सद्गुरूंचे ज्ञान प्रगट होऊ शकत नाही. शुध्द ह्दयातच सत्य ज्ञानाचा प्रसार होऊन शांती आणि विज्ञानाची प्राप्ती होते.



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअ‍ॅप करा ८५५४८८३१६६.**

## देवदर्शन

आधुनिक केसरी

पण एक लक्षात ठेवणे जरूरीचे आहे की जीवन जगत असताना एक मन मात्र आपले परब्रम्हाच्या ओढीकडे लागलेले आहे. मी खरा,जग खरे व हे ब्रम्हही खरे अशीच काहीशी स्थिती आपल्या मनाची होते. आपले प्रामाणिक मन काळ, कार्यकारण, स्थळ या चौकटीच्या बाहेर जायला तयार होत नाही. आता तुम्ही हा समास वाचत आहात,पण वरच्या लिखाणाचा विचार करून आपले मन स्वस्थ बसत नाही. आपलं मन म्हणते की"निर्गुण ब्रम्हामध्ये हे द्रुष्य, सगुण विश्व कसे निर्माण झाले असेल? आपल्या अज्ञानी मनाची ही जिज्ञासा पुर्ण करण्यासाठी प्रथम आपणं हे लक्षात ठेवावे की विश्वनिर्मिती व विश्वरचना वर्णन करण्यासाठी द्रुष्याचाच आधार घ्यावा लागतो द्वैताचीच भाषा वापरावी लागते. कोणत्याही प्रकारची निर्मिती होण्यासाठी काहीतरी हालचाल करावी लागते. ही हालचाल हा शक्तीचा गुण आहे. हे विश्व निर्माण करण्यासाठी त्याच्या मुळाशी शक्ति असली पाहिजे. ब्रम्ह स्वरूपाशी एकरूप झालेल्या संतमहात्म्यांना प्रत्येक ठिकाणी एकचं एक घनदाट, निर्मळ, निश्चल, निर्गुण व संपूर्ण विश्वाला गवसणी घालणारी चिरंतर, चिन्मय, अभेद्य वस्तुची प्रचीती येते. तर आपल्या सारख्या सामान्य माणसाला अनित्य, चंचल, अनेकपणाने भरलेले सगुण, मेदयुक्त, भेदरलेल्या अवस्थेतील विश्व प्रचीतीस येते. संतांच्या व आपल्या सारख्या सामान्य माणसाचा हा फरक आहे आणि हे निर्विवाद सत्य आहे. समर्थ मुळमायेचे वर्णन करताना हे सांगतात की आदि परब्रम्ह एकच एक, नित्यमुक्त, अक्रिय, अखंड व नुसते आहे. त्याच्या ठिकाणी स्वतःची जाणीव निर्माण होते. "मी ब्रम्ह आहे"अशी सतत जाणीव निर्माण होते. हाच तो हरिसंकल्प होय.

या ठिकाणी आपण एक साधं ऊदा घेऊया आकाशात ढगांची दाटी झाली आहे. भर दुपारी प्रचंड काळोख पडलेला आहे. थोड्याच वेळात विजांचा कडकडाट होतो. प्रचंड पाऊस पडतो. नद्या नाले दुथडी भरून वहातात. आता पाऊस थांबला आहे. आकाश निळेशार झाले आहे. आकाशातील चंचल वायु उत्पन्न झाला तरी आकाश जसेच्या तसेच रहाते.त्याच प्रमाणे निश्चल परब्रह्म चंचल झाला तरी परब्रम्ह जसेच्या तसे निश्चल रहाते.परब्रम्हामध्ये अनंत शक्ति आहेत माया नावाची एक अति अद्भूत व विलक्षण शक्ति आहे. माया व परब्रम्हामध्ये वेगळेपणा नाही.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# संत कसे असतात

आधुनिक केसरी

आपले शहाणपण बाजूला ठेवून जो संताला शरण जातो तोच खरा साधक. ज्याला सर्व सृष्टी रामरूप दिसते, आणि शिष्यालाही जो रामरूप पाहतो, तोच खरा गुरू. सदगुरू कधीही मिंधेपणाने वागत नाही, आणि त्याला भीतीचा लवलेशही नसतो. आपला शिष्य कोणत्या आध्यात्मिक भूमिकेवर आहे हे संतांना कळते. देहबुद्धीचे लोक विषयाचे दास असतात, पण संत मात्र विषयावर मालकी गाजवतात. संतांजवळ जे समाधान असते ते आपल्याला लाभले, किंवा त्याची आवड उत्पन्न झाली म्हणजे संताची प्रचीती आली असे समजावे. औषध काय आहे हे न कळतासुद्धा रोग्याने ते श्रद्धेने घेतले तर त्याला गुण येतो, किंवा एखाद्याला स्वयंपाक करता आला नाही तरी त्याला अन्नाची चव समजते आणि तो पोटभर जेवू शकतो. त्याचप्रमाणे एखाद्याला ज्ञानाचा अनुभव येईल, पण शब्दाने त्याला तो सांगता येईलच असे नाही. मीठ खारट आहे याचे जसे आपल्याला दुःख होत नाही, त्याचप्रमाणे जगामधल्या लढाया,



हाणामाऱ्या, सज्जनांचा छळ, संकटे, यांचे संतांना वाईट वाटत नाही. 'वाईट वाटत नाही' याचा अर्थ ते त्यांना आवडते असा मात्र मुळीच नव्हे. पण मीठ जसे खारटच असणार, तशा जगात या घडामोडी होणारच, जगाची रहाटीच अशी आहे, हे समजून तो दुःख करणार नाही. किंबहुना, मीठ फार झाले तर खारटपणा जसा सहन होत नाही, तसे त्यालाही होईल. इतकेच नव्हे, तर त्याचा प्रयत्नही जगातले वाईट कमी करण्याकडेच असतो. विहिरीतल्या बेडकांना जशी समुद्राची कल्पना येत नाही तशी आपल्याला संतांची कल्पना येत नाही. संत हे पहिल्याने आपल्यासारखेच होते, परंतु अनुसंधानाच्या मार्गाने ते वर गेले. आपल्याला संत 'शोधण्याची' मुळीच जरूरी नाही. आपली इच्छा बलवत्तर असेल तर संतच आपला शोध करीत आपल्याकडे चालत येतील. आपली भावना कशी आहे इकडे संतांचे लक्ष असते. संत हा गुप्त पोलिसासारखा आहे; तो आपल्यामध्ये आपल्यासारखा राहतो, पण आपल्याला ओळखता येत नाही.

संताला स्वतःच्या शरीरात काय चालले आहे ते सर्व दिसते; म्हणून तो रोगाची काळजी करीत नाही. संताला कर्म मागेपुढे करता येते पण ते टाळता येत नाही; ते कुणाला तरी भोगलेच पाहिजे. संत जे साधन सांगतात ते आपल्या शक्तीप्रमाणेच असते. संत जो बोध सांगतात, त्याचे आपण थोडेतरी पालन करू या.

**बोधवचन : संत हा जसे बोलतो तसे वागतो. आपण बोलतो चांगले आणि वागतो मात्र त्याच्या उलट.**

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
मंगळवार, १८ एप्रिल २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari

# कडक उन्हाळ्यात स्वत:ला जपा !

## उन्हाचा सर्वाधिक धोका? नागरिकांनो काळजी घ्या

आधुनिक केसरी

राजरत्न भोजने

**उन्हाळा आला की उन्हापासून संरक्षण करण्यासाठी आपण वाट्टेल ते प्रयत्न करतो पण अनेकदा उष्मघाताचा धोका संभावतो. सर्वसामान्य पणे फेब्रुवारी महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापासून उन्हाळ्याची चाहूल लागण्यास सुरवात होते आणि मार्च महिण्यापासून प्रखर उष्णता जाणवायला सुरुवात होते. तापमानात अचानक झालेल्या या वाढीमुळे त्याचे गंभीर परिणाम मानवी शरिरावर होऊ शकतात. सर्वसामान्य निरोगी व्यक्तीला अचानक झालेली ही तापमानवाढ सहन करता येऊ शकते.पण नवजात बालकं, वयोवृद्ध व्यक्ती किंवा जुने गंभीर आजार असलेल्या लोकांवर याचा वाईट परिणाम होतो. त्यामुळे अशा वातावरणात आपण काही गोष्टींची काळजी घेणं आवश्यक आहे.**

सामान्यपणे तापमान किंवा त्यापेक्षा अधिक असल्यास उष्मालहर आली आहे असे मानण्यात येते. याउलट उन्हाळ्यात वातावरणाचे तापमान वाढल्यावर शरीराचे बाह्य तापमानही वाढते. या वेळेस हायपोथॅलॅमसकडून रासायनिक संदेश पाठवले जाऊन रक्तवाहिन्या प्रसरण पावू लागतात आणि बाह्य त्वचेखाली असलेल्या घर्मग्रंथी उत्तेजित होतात. त्यामुळे रक्तप्रवाहातील द्रव पदार्थ आणि क्षार वापरून घाम तयार होतो. या घामाचे बाष्पीभवन होऊन शरीराला थंडावा येतो. घाम येण्याच्या या प्रक्रियेत शरीरातील द्रव पदार्थ आणि पाणी तापमानानुसार अधिकाधिक वापरले जाऊन त्यांचा साठा कमी होत जातो. बाह्य उष्णतेमुळे शरीरातील पाणी कमी होण्याच्या क्रियेला 'हीट स्ट्रेस' किंवा उष्णता तणाव म्हणतात.



**या लोकांना उष्मघाताचा धोका अधिक असतो?**
वयाच्या पन्नास वर्षांवरील किंवा वयोवृद्ध लोकांना उष्मघाताचा धोका असतो .१ ते १० वर्षांवरील मुलांना उष्मघाताचा धोका असतो .गर्भवती महिलांनाही उष्माघाताचा धोका वाढतो .बीपीचा त्रास असणाऱ्या लोकांनाही उष्मघाताचा त्रास होतो .याशिवाय हार्टचा आजार किंवा श्वास घ्यायला त्रास होणाऱ्यांना किंवा इतर कोणताही मेजर आजार असणाऱ्यांनाही उष्मघाताचा धोका अधिक असतो .

**उष्माघात वाचण्यासाठी काळजी घ्यावी?**
उन्हाळ्यात भरपूर पाणी प्यावे . पाण्याची बाटली सोबत ठेवावी .उन्हात जास्त वेळ फिरू नये .जास्त तापामानाच्या खोलीत काम करू नये .ग्लुकोज लेवेल मेंटेन ठेवावी .उन्हाळ्यात पातळ, सुती, पांढरे कपडे परिधान करावे .दिवसातून दोन तीनदा थंड पाण्याने अंघोळ करावी . उन्हात काम करताना डोक्यावर टोपी, स्कार्फ, कॅपचा वापर करावा . उन्हातून आल्यानंतर लगेच फ्रिजचे पाणी पिऊ नये . तुम्ही माठातील पाणी पिऊ शकता . लिंबू पाणी, उसाचा रस, ओआरएस, दही किंवा लस्सी, ताक नियमित प्यावे .बाहेर पडल्यानंतर शक्यतो डोकं टोपी, रुमाल यांनी झाकावं . किमान दोनवेळा थंड पाण्याने आंघोळ करावी .

**उष्माघाताची लक्षणे :** त्वचा कोरडी पडणे, खूप जास्त तहान लागणे, मळमळ होणे, उलटी होणे, थकवा येणे, ताप येणे, रक्तदाब वाढणे, मानसिक बेचैनी, अस्वस्थ वाटणे ही सर्व उष्माघाताची लक्षणे आहेत .याशिवाय उष्माघाताची तीव्रता अधिक असल्यास चक्कर येणे, बेशुद्ध अवस्था इत्यादि लक्षणे दिसून येतात व व्यक्ती कोमामध्ये जाण्याची अथवा दगावण्याची श्यक्यता असते .
**उष्माघातावरील घरगुती उपाय :** उष्माघातावर नियंत्रण ठेवण्यासाठी डोक्यावर थंड पाण्याच्या पट्ट्या ठेवणे, सम्पूर्ण शरीर थंड पाण्याने पुसुन घेणे, रक्तदाब कमी झाला असल्यास सलाईन लावून रक्तदाब वाढविणे, रुग्णाच्या डोक्यावर, काखेत कापडामध्ये गुंडाळून बर्फ ठेवणे इत्यादी उपचार केल्यास शरीराचे तापमान तात्काळ नियंत्रित होते . रुग्ण उन्हामुळे अत्यवस्थ झाला असल्यास रुग्णास अतिदक्षता विभागात दाखल करून तातडीचे उपचार केले जाऊ शकतात .





# बुद्ध, फुले-आंबेडकरांच्या विचारांची आवश्यकता

## डॉ. मिलिंद वाव्हळे यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** संपूर्ण मानव जातीला विशेषतः स्त्रियांना पारंपारिक आणि विषमतेच्या बंधनातून मुक्त करण्यासाठी आपले सर्वस्व पणाला लावून अख्ये आयुष्य मानव कल्याणासाठी अर्पण करणारे राष्ट्रपिता महात्मा. फुले आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती सनी सेंटर, छत्रपती संभाजीनगर, येथे उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून मिलिंद महाविद्यालयातील डॉ. मिलिंद वाव्हळे म्हणाले की, समाजात सकारात्मक परिणाम होण्यासाठी शिक्षण हेच एकमेव महत्त्वाचे साधन असून त्यासाठी बुद्ध, फुले - आंबेडकर यांच्या विचारांचे आपण अनुकरण करण्याची अत्यंत आवश्यकता आहे . तरच खऱ्या अर्थाने यांचा वारसा आपण पुढे नेऊ शकतो. पुढे डॉ. वाव्हळे म्हणाले की, हे करण्यासाठी आपल्याला प्रज्ञा,शील करुणा आदी तत्वांचे पालन करून चांगली विद्या प्राप्त करावी लागेल. संयुक्त जयंतीच्या निमित्ताने दि.११ एप्रिल ते १४ एप्रिल २०२३ या कालावधीत महिला आणि विद्यार्थ्यांसाठी विविध गटात संगीत खुर्ची, लिंबू चमचा,तीन पायांची शर्यत,नृत्य,चित्रकला, बॉल पासिंग आदी विविध स्पर्धा तसेच खुल्या गटासाठी डॉ. आंबेडकर सामान्य ज्ञान परीक्षा आयोजित करण्यात आली होती.सदरील विविध स्पर्धेतील ७५ विजेत्या स्पर्धकांना पारितोषिके देण्यात आली. पारितोषिक वितरण प्रसंगी बोलताना वैज्ञानिक अधिकारी मा. संजय सातपुते म्हणाली की, आपले आयुष्य सुखी - समृद्ध बनवण्यासाठी आपल्याकडे आत्मविश्वास असणे गरजेचे आहे कारण आत्मविश्वासाशिवाय दुसरी कोणतीच शक्ती मोठी नाही. फुले - आंबेडकर यांचे कार्य मानवाला प्रगतीच्या दिशेने नेणारे असून ते आपण सर्वांनी समजून घेतले तरच आपल्याला आपल्या महापुरुषांच्या विचारातून शक्ती आणि दिशा मिळू शकते. पुढे सातपुते म्हणाले की, यासाठी एकत्र येऊन आपण चांगले काय करू शकतो यावर चर्चा होणे आवश्यक आहे. यावेळी प्रास्ताविकात भारत जमधडे म्हणाले की,आपली मानसिक आणि वैचारिक पातळी प्रगल्भ होण्यासाठी फुले - आंबेडकर यांच्या विचारांचे प्रबोधनात्मक कार्यक्रम होण्याची सद्यस्थितीत आवश्यकता आहे. घेण्यात आलेल्या विविध स्पर्धा यशस्वी होण्यासाठी परीक्षक म्हणून जागृती बनसोडे , शीला बनकर,प्रज्ञा बनसोड, डॉ. वंदना जमधडे , कौशल्य खरात संगीता ढवारे, मोनिका पाईकडे, विशाखा कुलकर्णी, आदींनी सहकार्य केले.कार्यक्रमाच्या प्रारंभी सर्वांनी सामूहिक बुद्ध वंदना घेतली , तर सायंकाळी सनी सेंटर परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भव्य मिरवणूक काढण्यात आली.

# छ.संभाजीनगर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** आंबेडकरवादी संघर्ष समितीच्या वतीने पैठण गेट येथे भव्य असा स्टेज उभारण्यात आला होता. समितीचे मुख्य निमंत्रक श्रवणदादा गायकवाड
येणाऱ्या भीम रथाचे स्वागत मानचिन्ह देऊन करत होते. तसेच प्रत्येक भीम सैनिकांना हार घालून त्याचे स्वागत स्वागताध्यक्ष. किशोर - गडकर, यांनी केले. यावेळी अध्यक्ष मिलिंद मोकळे, कार्याध्यक्ष वसंतराज वक्ते प्रसिध्दीप्रमुखः मनीष नरवडे सहकार्याध्यक्ष अशोक गरुड, महासचिव- बाळुभाऊ वाघमारे, सचिव संतोष मोकळे, उपमहासचिव शांतीलाल लसगरे, सहकोषाध्यक्ष संजय म्हस्के, मुख्य संघटक- मधुकर त्रिभुवन, संघटक- सुनिल अवचलमल, सहसंघटक- अमोल भालेराव, ज्ञानेश्वर खंदारे, सरंक्षण प्रमुख; रमेश खरात. उपाध्यक्ष- पवन पवार राहुल वडमारे, मनोज वाहुळ, मुकेश खोतकर, विजय मोरे, सुरज मगरे, भाई प्रकाश जाधव, नवल सुर्यवंशी, अंकुश शिंदे, मिलिंद दाभाडे, सुनिल शिंदे, रामदास ढोले, प्रमोद मगरे, ज्ञानेश्वर खरात, गौतम सोनवणे, विजय जाधव, अनिल गवळे, बाळू मगरे, ॲड. अतुल कांबळे, किसन फुलमाळी, प्रविण बोर्डे, सुनिल अंभोरे, मदन भगुरे, धनराज पसरटे, अनिकेत दंडे, विजय पगारे, बाबासाहेब सुरडकर, किशोर ससाणे, सुनिल दिवे, पुष्पानंद नितनवरे, विशाल बनकर, अशोक (पप्पू) गिते, सहसचिव : शैलेश आराक, आर. टी. खंदारे, समाधान सावंत, हिरालाल काटोटे, रवि बोर्डे, नागेश केदारे, मनिष बोर्ड, संदिप अहिरे, कांचनताई सदाशिवे, , चंद्रकांत खोपे, रमेश मगरे, अमोल घोरपडे, अमोल भिवसने, सतिश कडवे, मिलिंद गायकवाड, आदीसह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.



# वाटूर येथे संत सेना महाराज यांची जयंती साजरी !

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** जिवबा महाले सामजिक प्रतिष्ठान महाराष्ट्र व अधार बहुउउदेशिय सेवाभावी संस्था वाटुर याच्या संयुक्त विद्यामानाने संतश्रेष्ठ सेना महाराज यांची जयंती सोमवार वाटुर परिसरात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. वैशाख वद्य द्वादशी हा दिवस सेना महाराज यांचा जन्मदिवस म्हणून साजरा करण्यात येत असतो. सकाळी वाटुर येथील जिवबा महाले सामजिक प्रतिष्ठान महाराष्ट्र या संघटनेच्या वतीने सेना महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी जिवबा महाले सामजिक प्रतिष्ठान महाराष्ट्र उपध्यक्ष गणेश राऊत, विरेंद्र केशरखाने, शुभम जनकवार, सुनिल मंडपे, राजेश राउत, एकनाथ किटाळे, नागनाथ राउत, वैजनाथ राउत, सुरेश बच्छीरे, रामप्रसाद राऊत, रोहन राउत, नितीन पाटोळे, भागवत गायकवाड हे उपस्थित होते.



# समलैंगिक विवाह कायदा

आधुनिक केसरी

समलैंगिक विवाहाला कायदेशीर मान्यता मिळावी याकरता सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. परंतु, या कायद्याला केंद्र सरकारने विरोध केला आहे. समलैंगिक विवाहामुळे समाजाच्या नितीमुल्यांना मोठी हानी पोहोचू शकेल असे केंद्राने आधी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात म्हटले होते. केंद्राने सर्वोच्च न्यायालायता रविवारी पुन्हा प्रतिज्ञापत्र सादर केले असून, समलैंगिक विवाह म्हणजे केवळ शहरी विचारधारा असून ही विचारधारा सर्वांनाच मान्य नसेल, असे म्हटले आहे. दरम्यान, समलिंगी विवाह कायद्यासाठी आलेल्या याचिकेवर सुनावणी घेण्याकरता सर्वोच्च न्यायालयाने ५ न्यायाधीशांचे घटनापीठ स्थापन केले आहे. याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती डी. वाय. चंद्रचूड, न्यायाधीश एस. के. कौल, रविंद्र भट, हिमा कोहली, पी. एस. नरसिंह यांच्या घटनापीठासमोर मंगळवारी (१७ एप्रिल) सुनावणी होणार आहे. लग्न ही एक सामाजिक संस्था आहे, समलिंगी विवाहाला मान्यता दिल्यास समाजात विषमता निर्माण होईल, असे केंद्राने प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे. तसेच, कोणताही कायदा करणे हे संसदेच्या अधिकारक्षेत्रात येतं. न्यायपालिका कायदा तयार करू शकत नाही. त्यामुळे समलिंगी विवाहाच्या कायद्यासाठी आलेली याचिका न्यायालयाने फेटाळून लावावी, अशी मागणीही या प्रतिज्ञापत्राद्वारे भाजपाप्रणित केंद्र सरकारकडून करण्यात आली आहे. समलैंगिक विवाहाला मान्यता दिल्यास याचे व्यापक परिणाम होऊ शकतात. सर्वोच्च न्यायालयात आलेली याचिका संपूर्ण देशाच्या विचारांचं प्रतिनिधित्व करत नाही. ही फक्त एक शहरातील अभिजात वर्गाची विचारधारा आहे. ही विचारधारा देशातील विभिन्न वर्ग आणि संपूर्ण देशातील नागरिकांची मानली जाऊ शकत नाही, असेही केंद्र सरकारने प्रतिज्ञापत्रात नमूद केले आहे. समलैंगिक विवाहाला मान्यता दिल्यास याचे व्यापक परिणाम होऊ शकतात. सर्वोच्च न्यायालयात आलेली याचिका संपूर्ण देशाच्या विचारांचं प्रतिनिधित्व करत नाही. ही फक्त एक शहरातील अभिजात वर्गाची विचारधारा आहे. ही विचारधारा देशातील विभिन्न वर्ग आणि संपूर्ण देशातील नागरिकांची मानली जाऊ शकत नाही, असेही केंद्र सरकारने प्रतिज्ञापत्रात नमूद केले आहे. सर्वोच्च न्यायालयात आलेल्या याचिकेवर सुनावणी घेतली जाऊ शकते का? यावर न्यायालयाने विचार करावा. कायदा फक्त संसदेत तयार केला जाऊ शकतो. न्यायपालिकेमार्फत कायदा केला जात नाही. याचिकाकर्त्यांनी नवी विवाह संस्था बनवण्याची मागणी केली आहे, जी अस्तित्वात असलेल्या विवाह संस्थेच्या विरोधातील आहे. विवाह संस्थेला फक्त सक्षम संसदेद्वारे मान्यता दिली जाऊ शकते, असेही केंद्राने प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे.

# पोलिसांनो जरा जपून...



दिलीप ना. धायगुडे
संपर्क क्र. ७७३८०३९१९५

आधुनिक केसरी

**सध्या सरकारी नोकरीच्या दिशा ही पुसट झाल्यामुळे पोलीस, आर्मी यांसारख्या खुल्या भरतीला जाताना कितीतरी अनेक पातळींमधून बाहेर निघताना आणि मग स्पर्धेच्या युगात एक - एक गुणाने जेव्हा यश मिळतं तेव्हा या मिळालेल्या अशा यशामागचं रहस्य जाणून घेऊन केलेल्या कष्टाला जर वेळोवेळी जाणीव करून दिली तरंच कष्टाचं चीज होऊन आनंदीमय जीवन जगता येईल. सज्जनांचं रक्षण आणि दुर्जनांचा नाश करणारे, कायद्याचे रक्षक, सर्वधर्मसमभाव या तत्त्वांचा अंगीकार करून दिवस रात्र, ऊन, वारा पावसाची तमा न बाळगता सण, उत्सव, समारंभ इत्यादींसारख्या कार्यक्रमांमध्ये स्वतःच्या कुटुंबांसोबत साजरा न करता जनतेच्या सेवेसाठी सदोदित राहून एकनिष्ठतेने, संयमाने आपले कर्तव्य बजावणाऱ्या ह्या पोलिसांचं खरंच कौतुक करावंसं वाटतं.**

सेवा कोणतीही असो, मग ती पाळण्यातल्या लहानग्यांपासून थोरांपर्यंत ते स्मशानभूमीच्या प्रेतांपर्यंत निष्ठुर भावनेने एखाद्या व्यक्तीला मानसिक, शाब्दिक आधार देऊन एक महत्त्वाचं काम करीत असतात. सर्वात मोठी जबाबदारी असते ती कायदा व सुव्यवस्था राखणे. आज समाजामध्ये विविध प्रकारचे लोक राहतात. कोणी स्वतःच्या फायद्याकरिता तर कोणी स्वतःचा फायदा होऊनही विपरीत घटनेला गालबोट लागावे म्हणून विविध गैरमार्गाचा वापर करून समाजामध्ये तेढ निर्माण करण्याचा अशा लोकांचा मानस असतो. अशावेळी जेव्हा एखादी घातक परिस्थिती निर्माण होते तेव्हा पोलिसांचे मनुष्यबळ कमी पडते. मोठी जबाबदारी असणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना तर दोन-दोन दिवस घरीही जाता येत नाही. एखाद्या चुकीच्या किंवा किरकोळ कारणांवरूनही समाजामध्ये दुफळीचे वातावरण पेटू लागते. या संबंध जमावाला काबूत ठेवण्यासाठी आणि ज्या लोकांना अशा लोकांमुळे मनात भीती निर्माण होते तेव्हा त्या लोकांना एकमेव आधार वाटतो तो खाकी वर्दीतल्या पोलिसांचा. घराचे दार उघडत नाही, झाडावर कावळा अडकला, रस्त्यामध्ये ट्राफिक जाम झाले, महापूर आला, वादळ आले, लाईट गेली, अतिरेकी हल्ला, मोर्चे, आंदोलन, संप, नवरा बायकोचे कौटुंबिक कलह इ. अशा विविध कारणांसाठी जेव्हा पोलिसांना हाक दिले जाते, तेव्हा हाच पोलीस आपल्या घरातील कुटुंबांसोबत जेवण करत व समारंभात असतानाही एवढेच नाही, तर दिवसभर कंटाळून येऊन आजारी असेल तरीही मोठ्या उत्साहाने तो कर्तव्यकरिता हजर राहून जनतेची सेवा करण्यासाठी तत्पर असतो, तेव्हा त्यांचा खूप अभिमान वाटतो.

तीक्ष्ण डोळे आणि कुशाग्र बुद्धिमत्तेला जागृत ठेवून एखाद्या संशयित व्यक्तीचा कोणताही परिचय नसतानाही स्वतःच्या ज्ञान तंत्राचा वापर करून एखाद्या गुन्ह्याची उकल त्याच्याकडून सहज समजून घेऊन अल्प कालावधीत, काही क्षणात त्याला बेड्या ठोकल्या जातात. सराईत गुन्हेगारांचा इतिहास पडताळून त्यांच्यावर वारंवार लक्ष ठेवून, त्यांच्यातील बारीक- सारीक हालचालींवर नजर ठेवून त्यांचाही अभ्यास केला जातो. जेव्हा एक रुपयांपासून ते करोडो रुपयांपर्यंतची धनदौलत लुटणाऱ्या टोळ्यांचा काही क्षणात अटकाव करण्यातही पोलीस यशस्वी ठरलेले आहेत. एवढ्या सगळ्या कर्तव्याबरोबरच नाकाबंदी, महत्त्वाच्या, अति महत्त्वाच्या बंदोबस्ताची ड्युटी, कोंबिंग, ऑल आउट ऑपरेशन, सागरी कवच यांसारख्या अतिसुरक्षिततेच्या बंदोबस्तात अविरतपणे कर्तव्यावर उभा असतो. कधी दिवस पाळी तर कधी रात्रपाळी करताना शरीराच्या होणाऱ्या हेळसांडकडे ही लक्ष देण्यास वेळ नसतो. त्यामुळे कितीतरी शरीर व्याधींच्या समस्येला सामोरे जावे लागते.

घरातील कौटुंबिक समस्या, नातेवाईकांच्या समस्या, कर्तव्यावरील ताणतणाव यांवर योग्य असा उपचार म्हणून कितीतरी पोलीस बांधव आज व्यसनाच्या विळख्यात अडकलेले दिसून येतात. विविध प्रकारचे व्यसन केले म्हणजे आपण त्यामधून अलगद बाहेर पडू, असा गैरसमज असणाऱ्या पोलीस बांधवांनी व्यसनांपासून जरा दूरच राहिलेलं बरे! काही क्षणांची मजा किंवा मौजमजा करून स्वतःच्या शरीराला बरबाद करून ज्या आपल्या पगारावर, नोकरीवर आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो, आपले कुटुंब आनंदी राहून समाजात अभिमानाने फिरू शकतो; पण अशा कृत्यांमुळे आयुष्यभराची कायमचीच सजा मात्र मिळते. ज्या वयामध्ये शरीर संपत्ती कमवून सुखी समाधानी जीवन जगायचे त्याच वयाच्या पूर्वार्धात आपल्या जीवनाच्या अस्ताला सामोरे जाण्याची वेळ येते. कोण म्हणतो जीवन मजेत जगायचं बिनधास्तपणे कोणाचाही विचार न करता..! तर कोण म्हणतो जीवन मजेत जगायचं पण सावधपणे कुटुंबाचा विचार करून.. आपणच कमवायचं आणि घालवायचं. पण संपत्ती ही काही ठराविक काळापुरतीच आपल्या सोबत असते ती क्षणभंगुर असते. गीता सार सांगते की, आज आपले आहे उद्या कोणाचे तरी नक्की असणार आहे पण त्यासाठी कर्मबंधनाची तत्त्वे जर पाळून जीवनप्रवास चालू ठेवला तर असंख्य संकटांवर मात करून मार्गात येणाऱ्या काट्यांवर सहज विजय मिळवू शकाल.

अवेळी झोप, जेवणाचा अनियमितपणा, कर्तव्यावरील अमर्याद वेळ यामुळे मिळेल ते जंकफूड सारखे पदार्थ सेवन करणे त्यामुळे प्रकृतीमध्ये बिघाड होऊन आज कितीतरी पोलीस हृदयविकार, बीपी, मधुमेह, कर्करोग यांसारख्या आजाराच्या विळख्यात सापडलेले आहेत. एवढा सगळा शरीर प्रकोप असूनसुद्धा कर्तव्याशी प्रमाणे राहून ड्युटी करताना दिसून येतात. सध्या पोलीस दलामध्ये गेल्या महिन्याभरामध्ये कितीतरी कर्मचारी हृदयविकार, कर्करोग, आत्महत्या तर कोणी अपघातामध्ये मृत्यू झाल्याची बातमी विविध माध्यमातून दिसून येते आज अशी परिस्थिती आहे की पोलिसांनी नक्की कसे जगायचे ? मृत्यूचा सापळा ही पोलिसांनाच का टार्गेट करतो आहे हा मोठा यक्ष प्रश्न आहे. कोणी कौटुंबिक कारणास्तव तर कोणी मानसिक ताणतणावाखाली आत्महत्या करीत आहेत. तसेच अपुऱ्या मनुष्यबळामुळे वाढता ताणतणाव दिसून येतो. ज्यावेळी आठ तास कर्तव्य होते तेव्हा मानसिकताही व्यवस्थित होती, जरूर मान्य आहे की, मनुष्यबळ अभावी अडचणी येत आहेत. नवीन भरती प्रक्रियेत मनुष्यबळाची संख्या वाढवली आणि कामाचे तास कमी केले तर काही प्रमाणात फरकही पडू शकतो. व्यसनांच्या आहारी न जाता आणि कर्तव्यावर येताना जाताना प्रवासात घाई गडबड न करता पोलिसांनी जरा जपून.. आपल्या खाद्य संस्कृतीला आणि व्यसनांपासून जरा दूर राहून स्वतःबरोबरच कुटुंबाचाही विचार केला तर मिळालेला हा मनुष्य जन्म नक्कीच सार्थक झाल्यासारखं वाटेल.



# झाडे लावा, झाडे जगवा संकल्पना रुजवा

आधुनिक केसरी

**आपल्या भारताची लोकसंख्या जसजशी वाढत आहे तसतशी झाडेसुद्धा कमी होत आहेत. त्याचा परिणाम पर्यावरणावर होत असल्याचे आपण पाहत आहोत. जळणासाठी आणि घरे बांधण्यासाठी बेसुमार वृक्षतोड केली गेली त्यामुळे उष्णता वाढली. पावसाचे प्रमाण कमी झाले. जमिनीची धूप होऊन ती नापीक झाली. दुष्काळाचे प्रमाण वाढले. परिणामी हवेच्या प्रदुषणासारख्या समस्यांना मानवाला तोंड द्यावं लागत आहे.**

'झाडे लावा झाडे जगवा' ही संकल्पना राबविली जात आहे. व प्रत्येक वर्षी त्याप्रमाणे वृक्षारोपण पण केलं जातं व वृक्षलागवडीची वृक्षांची संख्या सरकारी आकडेवारीनुसार लाखोंवर सांगितली जाते, पण जी लाखो झाडे लावली जातात, त्याच्यातली जगतात किती ? किंवा जगविण्याचे प्रयत्न किती केले जातात, याचा विचार व्हायला हवा! फक्त वृक्षारोपण करून चालणार नाही, तर त्यांचं संवर्धनसुद्धा करणं, ही काळाची गरज आहे. दरवर्षी झाडे लावली जातात; पण झाडे लावण्याचे खड्डे तेच असतात, फक्त झाडे बदलतात. असे चित्र खूप वेळेस पाहायला मिळते. शेकडो झाडे तोडून त्या ठिकाणी मोठी इमारत उभी केली जाते, असे चित्र आपण पाहतो. अशाप्रकारे सर्रासपणे वृक्षतोड केली जात आहे. या वृक्षतोडीमुळे मानवी जीवनासोबत वन्यजीव, पशुपक्षी यांचे जीवनसुद्धा धोक्यात येत आहे वृक्षतोडीने जंगले नष्ट केली जात आहेत. जे कोणी हिरवाई, जंगले नष्ट करणारे विघ्नसंतोषी आहेत त्यांच्यावर वेळीच कठोर कारवाई केली पाहिजे तरच निसर्ग वाचेल !! झाडे लावा झाडे जगवा मराठी निबंध, आपल्या जीवनात जेवण आणि पाण्याइतकेच वृक्ष महत्त्वाचे आहेत.



झाडाशिवाय जीवन खूप कठीण होईल किंवा आपण असे म्हणू शकतो की जीवन संपेल कारण झाड आपल्याला निरोगी आणि समृद्ध जीवन देण्यासाठी खूप महत्वाचा पैलू आहे. वृक्ष आपल्याला प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष जीवन देतो कारण ते ऑक्सिजन उत्पादनाचे स्त्रोत, $CO_2$ वापराचे स्रोत आणि पावसाचे स्रोत आहे. निसर्गाने पृथ्वीवरील मानवतेला दिलेली ही सर्वात मौल्यवान भेट आहे, ज्याबद्दल आपण कृतज्ञ असले पाहिजे आणि त्याचा आदर केला पाहिजे तसेच मानवतेच्या भल्यासाठी त्याचे जतन केले पाहिजे. वृक्ष वाचवा, जीवन वाचवा ही केवळ घोषणा नाही, ही एक जबाबदारी आहे जी पृथ्वीवर राहणाऱ्या प्रत्येक मनुष्याने समजून घेतली पाहिजे आणि स्वीकारली पाहिजे. आपल्या सर्वांसाठी झाडे वाचवून आपले निरोगी वातावरण आणि हरित पृथ्वी वाचवण्याची ही एक मोठी संधी आहे. वृक्ष पृथ्वीवरील जीवनाचे प्रतीक आहे आणि अनेक लोक आणि वन्य प्राण्यांचे नैसर्गिक घर आहे. आजच्या आधुनिक जगात जिथे शहरीकरण, औद्योगिकीकरण आणि जागतिक तापमानवाढ झपाट्याने वाढत आहे तिथे वृक्ष वाचवणे खूप महत्वाचे आहे. तांत्रिक जगात जिथे लोक फक्त काम करत आहेत आणि स्वतःसाठी लढत आहेत, फक्त झाडे इतरांसाठी ( मानव आणि प्राणी ) जगतात. फळे, भाज्या, भाज्या, फुले, मसाले, थंड सावली, औषध, मुळे, झाडाची साल, लाकूड, कोंब इत्यादी पुरवून पृथ्वीवरील जीवनाचे अनेक प्रकारे पोषण होते.

झाडे पृथ्वीवरील जीवनाचे सर्वात मौल्यवान आणि महत्वाचे साधन आहेत. पृथ्वीवरील आरोग्य आणि व्यावसायिक समुदायासाठी याचा खूप उपयोग होतो. काही प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष मार्गांनी पृथ्वीवरील या सर्व जीवांचा प्राण्यांना फायदा होतो. पृथ्वीवरील प्रत्येक गोष्ट परस्परांशी जोडलेली आहे आणि निसर्गाशी संतुलन ठेवून चालते, जर त्यात काही गडबड झाली तर संपूर्ण वातावरण विस्कळीत होऊ शकते आणि पृथ्वीवरील जीवनाला हानी पोहोचवू शकते.

**राजू जाधव, मांगूर जि.बेळगांव**

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# संविधानामुळेच राजकीय लोकशाही अबाधित : सरवदे






आधुनिक केसरी न्यूज

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना लहानपणापासून शेवटपर्यंत या देशातील जातीवादी व्यवस्थेने प्रचंड छळले, तरी त्यांनी आयुष्यात कधीही सुडाचे राजकारण केले नाही. उलट त्यांनी देशाप्रति दाखवलेली निष्ठा आज आम्हाला दीपस्तंभासारखी मार्गदर्शन करीत आहे. त्यांनी देशाच्या विकासासाठी राबवलेल्या अनेक योजना हितकारक ठरल्याचे आपण पाहत आहोत. देशातील स्त्रियांसाठी, शेतकऱ्यांसाठी, कामगारांसाठी व दीनदुबळ्यांसाठी राज्यघटनेत मौलीक अधिकार प्रदान केलेच परंतु विविध जाती-धर्म व विविध संस्कृती असलेल्या या देशाला एक राष्ट्र म्हणून ओळख निर्माण करून देणारे संविधान त्यांनी लिहिले. या संविधानामुळेच आज देशातील राजकीय लोकशाही अबाधित आहे. ही राजकीय लोकशाही सामाजिक लोकशाहीत परिवर्तित व्हावी हे त्यांचे स्वप्न होते. त्यासाठी नव्या पिढीने एक आव्हान समजून प्रामाणिकपणे संघर्ष करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक भीमराव सरवदे यांनी केले.

पेठेनगर येथील साकेत बुद्ध विहार समितीच्या वतीने आयोजित डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 132 व्या जयंती कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. श्री. सरवदे पुढे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वंचित वर्गास राजकीय आणि सामाजिक दृष्ट्या सक्षम बनवण्याच्या दिशेने केलेल्या अथक प्रयत्नामुळे आज ते जगात एक आदर्श व्यक्तिमत्व बनले आहेतच; परंतु समता आणि सामाजिक न्यायाची त्यांची दृष्टी आज संयुक्त राष्ट्राच्या विकास आराखड्याचा एक महत्त्वपूर्ण भाग बनली आहे हा केवळ बाबासाहेबांचाच नव्हे तर संपूर्ण भारत देशाचा सर्वात मोठा गौरव आहे. बाबासाहेबांनी दिलेले परराष्ट्र धोरण, शैक्षणिक धोरण व अर्थनीती यांसाठी भारतीय समाज आज त्यांचा ऋणी आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी साकेत बुद्ध विहार समितीचे अध्यक्ष डॉ. यशवंत कांबळे हे होते. मंचावर कार्याध्यक्ष इंजि. भास्कर मस्के यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला बुद्ध वंदना घेण्यात आली. प्रमुख पाहुण्यांचा परिचय अनिता म्हस्के यांनी करून दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. मंगला झिने यांनी केले. सूत्रसंचलन उर्मिला ओहोळकर यांनी केले, तर उपस्थितांचे आभार धनराज गोंडाने यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता धम्मगाथेने करण्यात आली. कार्यक्रमासाठी पेठेनगर ( साकेत नगर ) येथील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते, विशेषतः महिलांची उपस्थिती सर्वाधिक होती.

## सप्तश्रृंग गडावर अगोदर पोलिसांची मुजोरी

### पत्रकारांचा वार्तांकनावर बहिष्कार टाकण्याचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** साडेतीन शक्तीपीठापैकी आद्यपीठ श्रीक्षेत्र सप्तशृंगी गड या ठिकाणी मानाच्या पायरीवर बूट घालून वावरणाऱ्या सुरक्षा रक्षकाचे छायाचित्र काढणाऱ्या पत्रकाराचा मोबाईल हिसकावत व्हिडिओ नष्ट करून पत्रकारास अपमानास्पद वागणूक दिल्याप्रकरणी सप्तश्रृंगी देवस्थान पुन्हा एकदा चर्चेत आले आहे.

चैत्रौत्सवानंतरही भाविक मोठ्या प्रमाणावर गडावर गर्दी करीत आहेत. मात्र येथे महाराष्ट्र सुरक्षा बलाचे कर्मचारी भविकांसोबत बाचाबाची व दादागिरी करतात. याबाबत स्थानिक तसेच पत्रकारांनी संस्थानकडे वारंवार तक्रार केल्या मात्र दखल घेतली गेली नाही. महाराष्ट्र सुरक्षाबल कर्मचाऱ्यांची दादागिरी थांबवावी तसेच पूर्ण एजन्सी बरखास्त करून या ठिकाणी बेरोजगार भूमिपुत्रांच्या मुलांना नोकरीत सामावून घ्यावे या मागणीसाठी संपूर्ण गावात ग्रामस्थांच्यावतीने दोन दिवस बंद पाळण्यात आला होता. मात्र या आंदोलनाकडे दुर्लक्ष करण्यात आले. याबाबत संस्थानकडे पत्रव्यवहारही करण्यात आला आहे.

सप्तश्रृंगी मंदिराची पहिली पायरी मानाची पायरी मानली जाते. तिची भाविक मनोभावे पूजा करतात. मात्र या पायरीवर हे सुरक्षा रक्षक पादत्राणे घालुन वावरतात. त्यामुळे भाविकांच्या भावना दुखवल्याने येथील स्थानिक पत्रकार परिस्थिती जाणून घेण्यासाठी गेले व मोबाईलद्वारे चित्रीकरण करत असताना मोबाईल हिसकावत व्हिडिओ नष्ट करण्यात आला. सुरक्षारक्षकांची दादागिरी मोठ्या प्रमाणावर वाढली असून त्याचा फटका पत्रकारांनाही बसत आहे. या अगोदरही स्थानिक पत्रकार तसेच जिल्ह्यातून आलेल्या पत्रकारांना अपमानास्पद वागणुकीस सामोरे जावे लागले आहे.

सप्तश्रृंगी देवी संस्थानने नेमलेले महाराष्ट्र सुरक्षा बल कर्मचारी हे स्थानिक व भाविकांवर कायमच दादागिरी करत असतात . याचा प्रत्यय मला आलेला आहे . याबाबत मी संस्थानला याविषयी कळवले आहे मात्र त्यांचेकडून कुठलीही कार्यवाही नाही .
**विजय दुबे,**
**स्थानिक, सप्तश्रृंगी गड**

राज्यभरातून आलेले माध्यम प्रतिनिधी आई भगवतीचा महिमा तसेच भाविकांच्या अडीअडचणी आपल्या माध्यमातून भाविकांपर्यंत पोहोचवत असतात . मात्र माध्यम प्रतिनिधींचा मोबाईल हिसकावत व्हिडिओ नष्ट करणे हे निंदनीय असून असून आम्ही निषेध व्यक्त करतो . त्याचबरोबर सुरक्षा रक्षकांनी भावना दुखावल्या जातील असे कृत्य करू नये अशी ताकीद देतो .
**रमेश पवार, सरपंच, सप्तश्रृंगी गड**

चैत्रौत्सवानंतरही भाविक मोठ्या प्रमाणावर गडावर गर्दी करीत आहेत . मात्र येथे महाराष्ट्र सुरक्षा बलाचे कर्मचारी भविकांसोबत बाचाबाची व दादागिरी करतात . सुरक्षारक्षक नेहमीच भविकांशी अरेरावीने वागत असतात हे आमच्या देखील वारंवार निदर्शनास आले आहे . त्यामुळे त्यांची हकालपट्टी करून स्थानिकांना संधी द्यावी . यापुढे सुरक्षा रक्षकांची दादागिरी खपवून घेतली जाणार नाही, तसे आढळल्यास मोठे जनआंदोलन छेडले जाईल .
**प्रकाश कडवे, भाजप शहराध्यक्ष .**





## महसूल पथकाकडून वाळूसाठा जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** १६ एप्रिल महसूल पथकाने परतुर तालुक्यातील गोळेगाव येथील गोदावरी घाटातील एक लाख ऊन अधिक किमतीची बारा ते पंधरा ब्रास अवेद्य वाळू साठा जप्त करून तो आष्टी पोलीस ठाणे येथे हलविला. रविवार दिनांक १६ एप्रिल रोजी संध्याकाळी पाच ते सहा च्या दरम्यान ही कारवाई पथकातील गोळेगाव येथे तलाठी प्रताप राऊत व गोळेगाव पोलीस पाटील बबनराव डोळस यांनी केली परतुर तालुक्यातील गोळेगाव येथील गोदावरी घाटातील नदीपात्रात अनेक ठिकाणी अवैध्य वाळूसाठी जमा करण्यात असल्याची माहिती तहसीलदार रूपा चित्रा यांना मिळवली होती त्या अनुषंगाने तहसीलदार यांच्या पथकाने गोदावरी नदीपात्रात पाणी केले असंख्य त्या ठिकाणी आवेद्य वाळू साठे आढळून आले पंचनामे करून ते जप्त करण्यात आले बारा ते पंधरा ब्रास वाळू भाव अंदाजे एक लाख रुपये किमतीची वाळू जप्त केली जप्त केलेल्या वाळू साठा ट्रॅक्टरच्या साह्याने आष्टी येथेल पोलीस ठाण्यात हलवण्यात आले असल्याची माहिती पथकाने दिले गोळेगाव येथील तलाठी प्रताप राऊत यांनी दिली.

## दोन बछडे असलेली ताडोबातील वाघीण जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या बफरमध्ये सिरकडा येथे छोटी राणी टोपणनाव असलेली आणखी एक वाघीण जखमी अवस्थेत आढळून आली आहे. चार शावकांसह भानुसखिंडी वाघीण तिच्या मागच्या पायाच्या दुखापतीतून अद्याप पूर्णपणे सावरली नसतानाच आणखी एक वाघीण जखमी असल्याचे समोर आल्याने वन खात्यात खळबळ उडाली आहे. जखमी वाघिणीच्या मानेला खोल दुखापत झाल्याचे सांगण्यात येत आहे. ताडोबाच्या बफर झोनमधील गावे तृणभक्षी प्राण्यांना सापळ्यात अडकवण्यासाठी आणि पिकाची नासाडी थांबवण्यासाठी वायरचे सापळे टाकण्यासाठी कुप्रसिद्ध आहेत.


महाराष्ट्र Business Katta












# रसधातू... आहार आणि गर्भ

मागील भागात आयुर्वेदिक गर्भसंस्कार मध्ये क्षेत्र



अर्थात गर्भाशय याबद्दल आपण विशेष माहिती जाणून घेतली, या लेखात आपण रस धातू म्हणजेच अंबु याबद्दल विशेष माहिती घेणार आहोत. अन्न हे पूर्णब्रह्म, भारतीय संस्कृतीमध्ये आपल्या आहाराला म्हणजेच अन्नाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. याबद्दल सविस्तर वर्णन पुढील एखाद्या लेखांमध्ये येईलच.

या अन्नापासूनच आपल्या शरीरामध्ये रस धातू बनतो, आयुर्वेद शास्त्रानुसार आपल्या शरीरात सात धातू असतात रस, रक्त, मांस, मेद, अस्थी, मज्जा व शुक्र. आपण जे अन्नग्रहण करतो त्यापासून जे काही पुढे भरण आणि पोषण होते, त्याचा पाया म्हणजे रसधातू. आहारापासूनच पुढे सात धातूंचे परिणमन होते, आयुर्वेदीय गर्भसंस्कारामध्ये गर्भनिर्मितीमध्ये गर्भसंभव सामग्री, यातील महत्त्वाच्या चार गोष्टींपैकी अंबू म्हणजेच रस धातु

या रस धातूचे उपधातू म्हणजेच "स्तन्य आणि रज", स्तन्य अर्थात बाळाचा पहिला आहार म्हणजे आईचे दूध आणि रज म्हणजे मासिक पाळीतील रक्तस्त्राव. अशाप्रकारे रस धातू हा गर्भसंस्कारामध्ये महत्त्वाचा घटक आहे.

**आहारं एव परमौषधं ।**

**आहार म्हणजेच महाभैषज्य**

आहारालाच तुमचे औषध बनवा हे आयुर्वेद शास्त्रामध्ये अनेक वर्षांपूर्वी सांगितलेले आहे. याचाच आधुनिक शास्त्रज्ञांनी

Let food be the your medicine.

म्हणजे तुमच्या आहाराला औषध बनवा असे नव्याने समीकरण मांडले आहे. स्त्रीचा आहार मुळापासूनच जर व्यवस्थित असेल संतुलित असेल तर स्त्रीबीज उत्तम होईल आणि त्या स्त्री बीजाचे भरणपोषण हे अंबू या धातूपासून होते, मग जेव्हा एखादी स्त्री विचार करते की आपल्याला गर्भधारणा ठेवायची आहे किंवा आपल्याला आई व्हायचे आहे तेव्हा या आहाराला महत्त्व द्यावेच लागते. माझ्याकडे येणाऱ्या बऱ्याच केसेस अशा असतात की वेळेअभावी किंवा एखादी आययुआय, आयव्हीएफ ट्रीटमेंट सुरू असताना, त्या स्त्रीच्या शरीरात कॅपॅसिटी नसल्याकारणाने बाहेरचा आहार ग्रहण केला जातो, किंवा कधीकधी तर या आहाराकडे दुर्लक्ष केले जाते, अशा वेळेस उत्तम प्रतीचा गर्भ कसा राहील बरे ? मग आपल्याला जर उत्तम संतती प्राप्त करायची असेल तर आपला रस धातू उत्तम प्रतिचा असणे गरजेचे आहे, आज-काल बाहेरचे पदार्थ, फास्टफूड, कोल्ड्रिंक्स, चाट, पिझ्झा, बर्गर, मैदयाचे पदार्थ, पॅकड फूड खाणे यांचे प्रमाण वाढले आहे, यामुळे मुलींमध्ये थायरॉईड, पीसीओडी सारखे मेटाबोलिक डिसऑर्डर्स वाढत आहेत. याला प्रतिबंध मिळवण्यासाठी विशेष करून मुलींचा संतुलित आहार असावा असे तज्ञांनी वारंवार सांगितलेले असते. गर्भधारणा राहण्यापूर्वीपासूनच जर स्त्रीचा आहार उत्तम असेल म्हणजेच अंबुधातू उत्तम असेल तर आई पासून बाळाला मिळणारा आहार देखील उत्तम प्रतीचा मिळेल. नऊ महिने याच अंबुधातूपासून बाळाचे संगोपन आणि वाढ होते. अशाप्रकारे आयुर्वेदिक गर्भसंस्कारामध्ये आहारास आणि पर्यायाने रस धातूस गर्भाच्या मासानु मासिक वाढीचा पाया समजला जातो.

पुढील लेखामध्ये आपण गर्भसंभव सामग्री मधील चौथा आणि शेवटचा टप्पा म्हणजेच बीज अर्थात स्त्रीबीज आणि पुरुष बीज याबद्दल सविस्तर माहिती पाहूया.








**डॉ. मंगल सुरेश ताठे [एम. डी.आयुर्वेद]**

**मो.9168101060**

**संचालक- शारदा क्लिनिक संचलित शाश्वत आयुर्वेद व गर्भसंस्कार चिकित्सालय, पिसादेवी, छत्रपती संभाजीनगर**

**फाउंडर - स्त्री वैद्या संचलित आयु पंख संघटना**


# औषधी ज्ञान धारणा व शास्त्रशुद्ध पंचकर्म



कर्करोग नियंत्रित ठेवण्यासाठी आयुर्वेदिक त्रिसूत्री. निश्चित कारण माहीत नसलेला अनेक प्रकारची लक्षणे दाखवणारा आणि उपचार करूनही यश मिळेलच याची शाश्वती नसणारा असा हा एक व्याधी आहे, थोडक्यात कर्करोगाबद्दल अनिश्चितता जास्त आहे, कर्करोग हा कोणत्याही वयात आणि शरीरात कोणत्याही ठिकाणी होऊ शकतो सामान्य माणसाच्या मनात गाठ म्हणजे कॅन्सर असे समीकरण असते मात्र प्रत्येक गाठ ही कॅन्सरचीच असेल असे नाही तसेच प्रत्येक कॅन्सर गाठीच्या रूपानेच व्यक्त होईल असेही नाही, आयुर्वेदात वर्णन केलेल्या साध्य, कष्टसाध्य, असाध्य अशा या रोगांच्या तीन प्रकारांपैकी कर्करोग हा कष्ट साध्य किंवा असाध्य स्वरूपाचा समजावा, शरीरातील सर्व लहान मोठ्या स्थूल सूक्ष्म स्तरावरील एकूण एक क्रिया वात-पित्त-कफ हे तीन दोष करतात शरीरातील विविध असंख्य पेशी आपापल्या स्वभावानुसार कार्यानुसार योग्य वेळेला तयार होतात वाढतात आपली प्राकृत कार्य पूर्ण करतात, झाल्यावर नष्ट पाऊन शरीराबाहेर फेकल्या जातात. उत्पत्ती स्थिती आणि विनाश या तिन्ही क्रिया पेशींच्या सूक्ष्म स्तरावरही चोखपणे होत असतात, या सर्व क्रियांसाठी प्रामुख्याने वातदोष व बरोबरीने पित्त व कफदोष जबाबदार असतात तसेच नवीन पेशीला जन्म द्यायचा म्हणजे शुक्रधातूचा पर्यायाने जीवनशक्तीचा सहभाग लागतोच जोपर्यंत ही सर्व तत्वे प्राकृत अवस्थेत असतात तोपर्यंत आपापली कार्य चोखपणे पार पाडत असतात. परंतु काही कारणांनी यामध्ये विकृती उत्पन्न झाल्यास पेशींचे स्वरूप बदलते कधी त्यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली तर गाठ तयार होते त्यालाच आयुर्वेदात अर्बुद म्हटले आहे. अर्बुदाचे वाताज- पित्तज- कफज -रक्तच - मंसज व मेदच असे सहा प्रकार आहेत. त्यातील रक्तच व मांसज अर्बुद असाध्य असतात, बाकीच्या चार साध्य प्रकारातही फार पसरणारी मर्म स्थानी होणार आहे स्त्रोत्सात होणारे व न हालणारे व एकावर एक स्तराने वाढणारी अर्बुद असाध्य समजले जातात अर्बुदावर चिकित्सा करताना सर्व अर्बुद छेदून मुळापासून काढावे लागतात. अर्बुदाचे थोडे जरी मूळ शिल्लक राहिले तर ते पुन्हा लवकर वाढते. त्यासाठी आयुर्वेदात अग्निकर्म व रक्त मोक्षणाचा उल्लेख आहे सध्या शस्त्रक्रिया रेडिएशन नंतर किमोथेरपी सारख्या उपाययोजना केल्या जातात मात्र त्यालाही मर्यादा असतात त्यामुळे कर्करोगावर उपचार करताना गाठ किंवा बिघडलेल्या पेशीला पूर्ण पूर्ववत करण्याबरोबरच विकृत झालेले त्रिदोष कमी झालेली जीवनशक्ती वीर्य ओज यांचाही विचार करणे आवश्यक आहे एकंदरीत कर्करोगात रक्त मांस दुष्टी, विकृती त्रिदोष असल्याने त्यात पंचकर्माची नितांत आवश्यकता आहे, शरीरावर झालेले आघात आणि मांसाहार करणाऱ्या लोकांमध्ये कर्करोग होण्याचे एक कारण ठरू शकते कर्करोगावर खालील उपचार पद्धती उपयोगी होतात

(१) व्यवस्थित शास्त्रशुद्ध पंचकर्मद्वारे पंचतत्वाची शुद्धी उदाहरणार्थ वातदुष्टीसाठी- अभ्यंग, स्नेहन, बस्ती.

(२) पित्तदोषासाठी- रक्तदृष्टीसाठी - विरेचन रक्त मोक्षन.

(३) मनोविकृतीसठी- शिरोधारा. (४) गर्भाशयाच्या कर्करोगात- योनिधवण, उत्तर बस्ती, धूपन (५) प्रकृतीनुसार योग्य औषधी योजना उदाहरणार्थ आमलकी, ज्येष्ठमध, शतावरी, गुळवेल, तुळस, प्रवळपिस्थी, गोक्षुरदी गुग्गुळ, कांचनार गुग्गुळ, कंठकार्यावलेह, अग्नीप्राश च्यवनप्राश आधी रसायन, औषधे योग्य सल्ल्याने घ्यावे. (६) ध्यानधारणा योग स्वास्थ्य संगीत आदींचा रोजच्या जीवनात केलेला अंतर्भाव आहारात जडांन्न तळलेले पदार्थ, मांसाहार, अंडी तिखट टाळावे. ताजे हलके अन्न खावे. बिडी, सिगरेट, तंबाखू मद्यपान, टाळावे वरील सर्व उपाययोजनांमुळे कर्करोग आवाक्याबाहेर राहणार नाही व कॉलिटी अँड क्वांटिटी ऑफ लाईफ मेंटेन केली जाईल..




**डॉ. अभिजीत भा. सावळे, एम डी (आयुर्वेद), श्री संत जगदीश हॉस्पिटल (वंध्यत्व निवारण व पंचकर्म केंद्र) छत्रपती संभाजीनगर 7588818505**


# दही खाण्याचे फायदे



थंड आणि मधुर दही कोणाला आवडत नाही ? दही कशा सोबतही खा - त्याची चव वाढवतेच. दही फक्त आहाराची लज्जतच वाढवत नाही तर आरोग्यही प्रदान करते. म्हणून तर सर्व आहार तज्ञांची यादी दह्याशिवाय सुरु आणि पूर्ण होत नाही. सर्वच प्राण्यांचे दुध आणि दुग्धजन्य पदार्थ पौष्टिक आहेत, परंतु या पौष्टीकतेमध्ये दह्याचा क्रमांक वरचा लागतो कारण दह्यासोबत खाल्लेले अन्न सहज पचते आणि त्या अन्नातील जीवनसत्वे आणि प्रथिने सहजरीत्या रक्तात आणि शरीरात शोषली जातात. म्हणून दह्याला 'परिपूर्ण आहार' म्हणून सर्वत्र मान्यता आहे. पोट 'भरल्याचे' समाधान टिकून राहते

भरपूर प्रथिनांनी युक्त आहार

ऊर्जेने युक्त आहार, प्रतिकारशक्ती वाढते

मधुमेह नियंत्रित राहतो, पचन क्रिया सुधारते

हृदय विकाराची शक्यता कमी होते

जीवनसत्वानी परिपूर्ण

आतड्यांचे आरोग्य सुधारते

चेहरा, त्वचा उजळते

केसांसाठी उपयुक्त मानसिक स्वास्थ्यासाठी

लसणाचे ५ औषधी गुणधर्म लसणाचे झुडूप २-३ फुट वाढते, खोड घट्ट, पाने अरुंद आणि चपटी असतात. या वनस्पतीच्या मुळाला लसूण कंद म्हणतात. या कंदावर पांढरे आणि पारदर्शक आवरण असते. लसणाच्या लागवडीसाठी सुपीक, भुसभुशीत आणि पाण्याचा निचरा होणाऱ्या जमिनीची गरज असते. त्यामुळे तिचे कंद चांगले पोसवतात आणि लसूण काढणे सोपे जाते. अति उष्ण लसणाचे कंद पोसवत नाहीत. याच्या लागवडीसाठी पाण्याची खूप गरज असते. हे बागायती पिक आहे. पाण्याची सोय असल्यास हे बारमाही पिक घेता येते. लसूण थंड आणि कोरड्या हवामानात वाढतो.

डांग्या खोकला, रक्त दोष, घटसर्प, बहिरेपणा, कुष्ठ रोग, संधिवात, मुळव्याध, यकृताचे आणि पित्ताशयाचे विकार इ.वर लसूण गुणकारी आहे.

कामोत्तेजना कमी होणे, संभोग शक्ती क्षीण झाल्यास लसणाचा उपयोग होतो.



श्वसन दोष, दमा | Asthma and respiratory disease

पचन विकार | Digestive disorder

उच्च रक्त दाब |High blood pressure

हृदय रोग | Heart trouble

कर्करोग | Cancer

त्वचा विकार | Skin disease.

# पी.सी.ओ.एस. व आयुर्वेद चिकित्सा

21व्या शतकात सगळच काही बदल चाललेला आहे, विज्ञानाच्या वेगवान प्रगतीने माणूसाची कायावाच्या मन बदलत चाललेले तसंच रोगाचे स्वरूप सुद्धा बदलत चाललेला आहे. साध्या आजाराची जागा आता मधुमेह रक्तदाब मानसिक विकार यांनी घेतली.

असाच एक वयात आलेल्या मुली महिलांमध्ये आढळणारा विकार म्हणजेच पी.सी.ओ.एस., याचा परिणाम महिलांच्या शारीरिक मानसिक कुटुंबी किंवा एक सामाजिक आरोग्यावर होत आहे. 21 व्या शतकात वंधत्वाचा प्रमुख कारण पी.सी.ओ.एस. सुद्धा आहे

*पी.सी.ओ.एस. मध्ये बीज ग्रंथीवर अनेक पाण्याने भरलेल्या फुलाच्या आकाराचे आवरण तयार होते आणि सोनोग्राफीत पाहिल्यास ते नेकलेस सारखं दिसतं.

आयुर्वेदानुसार पी.सी.ओ.एस.अंबू विकृतीमुळे झालेला क्षेत्र दोष.

वातदृष्टी - हा लक्षण समोरचे वयात आलेल्या स्त्रियांशी संबंधित आहे म्हणजेच आयुर्वेदानुसार वात दृष्टी संबंधित आहे. यामध्ये असणारे प्रमुख लक्षणे म्हणजेच ग्रंथी लता शारीरिक व मानसिक विकृती व पाळीची अनियमितता.

*अग्नी व पित्तदृष्टी-


रोगाः सर्वsपी मंद अग्नो ।

*कफ दृष्टीः कपाला येणारी शुष्कता मार्ग व रोगाचे प्रमुख कारण आहे.


*पीसीओएस होण्याचे कारण--रजोस्वला परिचर्या न पाळणे

- बदलती लाईफस्टाईल
- अति विचार व टेस
- व्यायामाची कमतरता
- अति प्रमाणात प्लास्टिकचा वापर
- उशिरा होणारे लग्न व त्यामुळे उशिरा लाभलेला मातृत्व
- अतियान
- पौष्टिक आहाराची कमतरता

लक्षण- अनेक वेळा सोनोग्राफी तपासणी करताना स्त्रीभिजामध्ये एक किंवा अनेक ग्रंथी ह्या सिस्टीक एपेरन्स




आढळून येतात. - चेहऱ्यावरील रोम, लव उठते, शरीरावर पुरुषाप्रमाणे केस वाढतात आवाजात बदल जाणवते, याला हे हिरुटिस्म असे म्हणतात. यामध्ये स्त्रियाच्या शरीरात अँड्रोजन पुरुषी स्त्राव प्रमाणापेक्षा अधिक स्तवण होते त्यामुळे काही पुरुष लक्षणे दिसतात.




- अनियमित पाळी -स्त्रीबीज निर्मिती न होणे किंवा होऊनही ते बीज गर्भधारणे सक्षम नसणे.
- अति प्रमाणात वजन वाढणे-कारण सिरम इन्सुलिनचा रजिस्टन्स फॉर्म होतो जे जेवण जेवतात त्यातील साखर न पचत साचत जाते व एनर्जी मिळत नाही पेशंट थकतो वजन वाढते.
- पीसीओडी मध्ये ऑइल सेक्रेशन वाढतं कारण की मध्ये तेल वाढत होते केसाच्या मुळाच्या तिथे जमा होते
- आलस्य अति प्रमाणात वाढते.
- चिडचिड वाढते.
- पाळी मध्ये रक्तस्त्राव कमी होते

वंधत्व

चिकित्सा- पी.सी.ओ.एस.मध्ये चिकित्सा देताना प्रामुख्याने तीन गोष्टीचा विचार करावा लागतो आहार, विहार आणि दिनचर्या

*हेतू परिवर्जन- - मानसिक स्वास्थवर्धन

- वातशमन विशेषता : रूक्षता नाहीशी करून कफाची कमी करून मार्ग अवरोध दूर करणे.

*प्रमुख चिकित्सा - बस्ती चिकित्सा

- विवाहित असेल तर उत्तर बस्ती ही उत्तम चिकित्सा आहे

*शमन चिकित्सा

- अग्निदीपन व पाचन चिकित्सा
- वात शमन विशेषता

*औषधी चिकित्सा

- कुबेराक्षवटी
- कांचनार गुगुळा,
- रज प्रवर्तनी वटी
- चित्रकधी वटी
- त्रिफळा गुगुळ

*पथ्य अपथ्य

-नैसर्गिक, प्रक्रिया न केलेले अन्न हिरवे पालेभाज्या आणि ते रसायन आहारी द्रव्य दूध, घृत फळे द्राक्ष, डाळिंब, शेंगदाणे अक्रोड, बदाम, काजू , यासारखे ड्रायफ्रूट घेणे.

प्राथिनेयुक्त पदार्थ खावे पाण्याची प्रमाण प्रकृती ऋतूनुसार योग्य असावे.

अतिथी क्षण उष्णता लवान आमलासात्मक विधारी आहार टाळावा.

*जीवनशैलीत बदल

दैनंदिन शारीरिक हालचाली, व्यायाम, चालणे, योग , ध्यान यासारख्या गोष्टीचा समावेश करावा. यामुळे शारीरिको मानसिक स्थैर्य मिळते आणि वजन कमी होण्यास मदत होते.

*व्यायाम- योगा- सूर्यनमस्कार अवश्य करावा. धनुरासन, पवन मुक्तासन, सर्वांगासन, भुजंगासन,





# परतूर रेल्वे स्थानकात महामानवाची प्रतिमा

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** रेल्वे स्टेशन येथे साउथ सेंट्रल रेल्वे, नांदेड मंडल, परतूर च्या वतीने विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या 132 व्या जयंतीनिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे अनावरण नांदेड डिव्हिजनल सेक्रेटरी यांच्या परवानगीने सीनियर तिकीट बुकिंग क्लार्क गाडगे साहेब, नांदेड मंडळ जूनियर इंजि. अशोक साळवे, रेल्वे स्टेशन मास्टर अंकुर चौधरी,माजी आमदार सुरेश कुमार जेथलिया या मान्यवरांच्या हस्ते अनावरण करण्यात आले यात्रसंगी गटनेते बाबुराव हिवाळे,लायन्स क्लबचे मनोहर खालापुरे, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष रोहन वाघमारे, शिवाजी डोळस, तालुका अध्यक्ष रवींद्र भदर्गे, शहराध्यक्ष राहुल नाटकर,प्रदीप साळवे,विकास वेडेकर, पत्रकारअशोक ठोके, गौतम पाडमुख, दीपक हिवाळे, आदी उपस्थित होते.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा बसवण्या करिता सर्व आजी,माजी रेल्वे कर्मचारी यांनी सहकार्य केले विशेष सहकार्य आरसीसी व पंचशील मित्र मंडळ परतुर यांनी केले.

# वैजापुरात अक्षर सुधार कार्यशाळा

आधुनिक केसरी न्यूज



**वैजापूर :** विद्यार्थ्यांच्या वळणदार व सुंदर अक्षरातून त्याची भावनिक, मानसिक व बौद्धिक क्षमता व्यक्त होत असते,या साठी वैजापूरच्या जि,प,कन्या प्रशाला शाळेचा नाविन्यपूर्ण उपक्रम मोफत अक्षर सुधार कार्यशाळा व विज्ञान कृती कार्यशाळा" चे अनुकरण राज्यातील ईतर शाळांनी अमलात आणून विद्यार्थ्यांच्या अक्षर सुधारण्यासाठी व वैज्ञानिक दृष्टी विकास साठी सर्वंकष प्रयत्न करावे असे आवाहन माजी शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपुत यांनी सोमवार( ता.१७ ) रोजी कन्या प्रशालेत या नाविण्यपूर्ण कार्यशाळेचे उदघाटन प्रसंगी उदघाटक म्हणून धोंडीराम राजपुत यांनी केले. अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक एस. के. पगार होते. एस. सी. निकाळे यांच्या संकल्पमेतून हा वर्ग सुरू झाला असूस त्यांना चित्रकला शिक्षक शशांक पाटील, श्रीमती व्ही.एस. दया टे या सहाय्य करीत आहेत, या वर्गाला आणखी विद्यार्थी वाढनाराआहेत, निकाळे, पाटील, सुरवंशी यांची संमयोचित भाषणे झाली,या प्रसंगी के.एस. सुरडकर, एन.जि.भोए यांच्या सह सर्वांनी सहकार्य केले. या नावीन्य पूर्ण कार्यशाळाचे अनुकरण राज्यातील ईतर सर्व शाळांनी करावे असे आवाहन धोंडीराम ध राजपूत यांनी केले.




# प्रकल्प संचालक पगारे यांची चारबन शाळेला भेट

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई चे प्रकल्प संचालक मा.कैलास पगारे साहेब यांनी बुलढाणा जिल्ह्यातील आदिवासी डोंगराळ भागातील जि.प.शाळा चारबन ला दि.16 एप्रिल रोज रविवारला भेट दिली.शाळेच्या प्रवेशद्वारावर पारंपरिक आदिवासी पोशाख परिधान केलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांनी साहेबांचे औक्षण करून,पुष्पवृष्टी व आदिवासी नृत्याच्या तालावर स्वागत केले.नंतर आदिवासी स्वागत गीताने उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. नंतर पगारे साहेबांनी चारबन शाळेतील पावरी वर्गखोलीला भेट दिली.चारबन शाळेत संपूर्ण पावरी आदिवासी जमातीचे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत त्यांना बोलीभाषेतून प्रमाण भाषेकडे वळविण्यासाठी शाळेतील शिक्षक दीपक उमाळे विविध उपक्रम राबवित आहेत.त्यासाठी त्यांनी पावरी मराठी असा द्विभाषा शब्दकोश निर्माण केला आहे.सोबतच पावरी वर्गखोली ही नाविन्यपूर्ण संकल्पना त्यांनी अंमलात आणली असून त्यासाठी वर्गखोलीत शरीराचे अवयव,प्राणी,पक्षी,वाहतुकीची साधने इ चित्रे पावरी व मराठी या दोन्ही भाषेचा वापर करून भिंतीवर रेखाटले आहे तथा तरंगचित्रांच्या माध्यमातून वर्गात लटकविलेले आहे.या सर्व उपक्रमांची माहिती पगारे यांना देण्यात आली. चारबन शाळेतील शिक्षकांनी विद्यार्थ्यांची पावरी भाषा सुध्दा अवगत केली आहे. अशा विविध उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढली व विद्यार्थी बोलीभाषेतुन प्रमानभाषेकडे वळून गुणवत्ता सुद्धा वाढली आहे ही माहिती जाणून पगारे यांनी चारबन शाळेतील शिक्षकांचे कौतुक केले. यावेळी जळगांव जा पं. स.चे गटशिक्षणाधिकारी श्री.वामन फंड ,माजी गटशिक्षणाधिकारी नारायण फाळके, गटसमन्वयक केशरसिंग राऊत,साहाय्यक कार्यक्रम अधिकारी अतुल देशपांडे, जि.प.शाळा चारबन मुख्याध्यापक गोवर्धन दांडगे, स.शिक्षक दीपक उमाळे,ममता गावित तथा गावकरी व विद्यार्थी उपस्थित होते.

# बुद्धभूषण मित्र मंडळाच्या वतीने आंबेडकर जयंतीनिमित्त अन्नदान

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** येथील बुद्धभूषण मित्र मंडळाचे वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३२ व्या जयंतीनिमित्त महादेव मंदिर चौक येथे अन्नदान करण्यात आले. परतुर शहरासह तसेच तालुक्यात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी विविध सामाजिक संघटनांनी व सामाजिक कार्यकर्त्यांनी तसेच विविध नेते मंडळी यांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती मध्ये सहभाग घेतला होता. बुद्धभूषण मित्र मंडळाचे अध्यक्ष स्वप्निल पहाडे हे दरवर्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अन्नदान करत आले आहे. तसेच यापुढेही आपण हे सामाजिक कार्य चालू ठेवणार आहे असे त्यांनी यावेळी बोलतांना सांगितले. यावेळी स्वप्निल पहाडे, तुषार पहाडे, अमोल पहाडे, सुनील पहाडे, रवि घोडे, सतीश पहाडे, राहुल पहाडे, आकाश पहाडे, निलेश पहाडे, अनिल पहाडे, कृष्णा वाघमारे, अनिकेत सोनपसारे, रूपेश पहाडे, संकेत सोनपसारे, सूरज पहाडे, आदर्श सोनपसारे, अजय निकाळजे, विकास पहाडे, बाला पहाडे, इंद्रजीत गायकवाड, अमरदीप सुतार, अमोल नाथभजन, गौतम प्रधान, अनिल जहार, दत्ता एक्कीलवाले, परमेश्वर बिल्लारे, सागर काजळे, पपु घायताड़क, इरफान शेख, भगवान साळवे, विशाल भादर्गे, किरण प्रधान, मिलिंद गायकवाड, अभि सुतार, प्रकाश प्रधान, विजय नाथभजन, विशाल साळवे, दिपक एक्कीलवाले, सागर पहाडे, पवन निकाळजे, वैभव डुकरे, साई मुपडे, दिपक नाथभजन, दत्ता लोखंडे, अरुण पवार, शिव पवार सह आदींनी परिश्रम घेतले.



# मन:शांती चे ऊर्जास्रोत सद्गुरु स्वामी समर्थ



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**अक्कलकोट निवासी श्री श्री सच्चिदानंद सदगुरू श्री स्वामी समर्थ महाराज हे नाव जरी एक वेळा उच्चारताल तरी आपल्याला या नावाचा महिमा दर्शन झाल्याशिवाय राहणार नाही. अनुभूती हेच अंतिम सत्य असतं पण त्याठी समर्पित भाव अपेक्षित असतो. धर्म हा वैयक्तिक अवस्थेचा भाग असतो. आपण जसे असतो तसं आपल्याला दिसत अथवा आपण ते मान्य करतो. ईश्वर आहे कि नाही हा ज्याचा त्याच्या व्यक्तिगत अस्थेचा भाग आहे. ईश्वराचे अनेक दुत या सृष्टी वर लोक कल्याण करण्यासाठी अवतार धारण करत असतात ती त्या वेळेची काळाची गरज असते .आध्यत्म हे आत्म्याच्या उन्नतीसाठी आहे.**

आधुनिक केसरी

शरीर नश्वर आहे आत्मा अमर असून शरीराचे कर्म दुःख कधी कधी एवढे प्रचंड मोठे असतात कि पुन्हा उभा राहण्याची ताकद राहत नाही आणि हिच ताकद पुन्हा निर्माण व्हावी . मानवी जीवनातील अनेक विवंचना आहेत त्या मधुन सामान्य जणांना मार्ग दाखविण्यासाठी सद्गुरू स्वामी समर्थ महाराज यांनी अवतार धारण केला.आपले अवातार कार्य पुर्ण केल्यानंतर या सृष्टीचा निरोप घेणं हे प्रत्येकाला क्रमप्राप्त असत. त्याच अनुषंगाने सद्गुरू स्वामी समर्थ महाराज यांनी सुद्धा आजाच्या दिवशी सृष्टीचा निरोप घेतला असला तरी त्यांच्या कार्याची महती प्रंचड आहे.आजही लाखो लोकांच्या हाकेला धावून दुःखा मुक्त करण्याची ताकद सद्गुरू स्वामी समर्थ महाराज यांच्या पावन चरणात आहे.आजही ते एक शक्ती रूपाने लोक कल्याण करण्यासाठी आपल्या सर्व मध्ये आहेत .हिच त्यांची अदभुत शक्ति आहे. मानवी मन हे प्रचंड चंचल आहे आणि हे मन जोपर्यंत स्थिर होत नाही तोपर्यंत ते अनेक समस्या दुःख शोधुन आणण्याच्या प्रयत्न करत पण हेच मन स्वामी चरणी समर्पित केले तर बहु दुःख वेदना संपुष्टात येतात.महाराष्ट्र हि साधु संत महंत यांच्या पावन स्पर्शाने पुणित झालेली भुमी आहे. भगवान श्री दत्तात्रेय यांच्या पासुन निर्माण झालेला नाथ संप्रदाय व नाथ संप्रदायातील प्रमुख संत नवनाथ ते हे विश्वची माझे घर हा उपदेश जगाला देणारे वारकरी संप्रदायाचा पाया रचणारे संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज व पुढील कालावधीतील जगद्गुरु संत तुकाराम महाराज,संत मुक्ताबाई,संत नामदेव महाराज,संत सावतामाळी,संत अवजीनाथ, संत चोखामेळा, संत गोरा कुंभार,संत साईबाबा,संत महात्मा बसवेश्वर, सद्गुरू स्वामी समर्थ, सद्गुरू, गजानन महाराज,संत तुकडोजी महाराज, सद्गुरू वामन भाऊ महाराज,संत भगवान बाबा,संत मन्मथ स्वामी, अशा अनेक संत महंतांनी देशाच्या कानाकोपऱ्यात भगवत धर्म ज्वलंत ठेवत लोक कल्याण करण्यासाठी आपलं संपूर्ण आयुष्य निस्वार्थ भावनेने समर्पित केले. जीवनातील सुख दुःखाच तत्वज्ञान सर्व सामान्य माणसाला समजेल असं सहज सोप्या भाषेत शब्द मध्ये निर्माण केले.

निःशंक हो निर्भय हो रे मना हा जीवनाला संजीवनी प्रदान करणारा महा मंत्र जगद कल्याणार्थ प्रचंड व प्रदीर्घ साधनेतुन निर्माण करत जागाल मार्ग दाखवणारे महान सद्गुरू प्रभु भगवान दत्तात्रेय यांचे अवतार समजले जाणारे सद्गुरू स्वामी समर्थ हे अंखडीत मनःशांती चे उर्जा स्त्रोत आहेत.गुरु भक्ती आणि निष्ठा व त्याची अलौकिक शक्ती हा जीवनातील परिवर्तनाची नांदी आहे. जीवन हा सुख दुःखाचा भवसागर असुन हाच भवसागर तरूण जाण्यासाठी हरीकृपेची गरज असते .हरीकृपा होण्यासाठी सद्गुरू लाभावे लागतात.जीवनातील भव दुःख हे काळोखा सारखे असतात. काळोखात मार्ग सापडता सापडत नाही.मग याच दुःखाच्या काळोखातुन पुढे जाण्यासाठी लाखो लोकांना निरंतर मार्ग दाखविण्याचे अविरात कार्य सद्गुरु स्वामी समर्थ महाराज यांनी केले व तेव्हा पासून आजपर्यंत अंखडित पणे त्यांच्या वैकुंठ गमना नंतर सुध्दा अविरतपणे हा कृपा आशिर्वाद चालू आहे. सद्गुरू स्वामी समर्थ महाराज यांचे विचार आणि तत्वज्ञान हे आजही एवढं प्रभावी आहे कि राज्यासह देश विदेशात त्यांचे लाखो भक्त गण आहेत. त्यांच्या कृपेचा वर्षाव अंखडीत असुन लाखो भक्तांना दैनंदिन जीवनात स्वामी समर्थ महाराज यांच्या कृपेने जीवन जाण्याची प्रेरणा मिळत आहे.सदगुरू स्वामी समर्थ महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त निमित्त कोटी कोटी प्रणाम.

# संतमंडळीचे काका; संतश्रेष्ठ गोरोबाकाका कुंभार



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**यातील आख्यायिकेच्या मागे चमत्काराचा भाग असलेला दिसून येतो. संतांच्या चरित्रात असे अनेकविध चैतन्याचे चमत्कार वर्णिलेले आहेत. चमत्काराचे चैतन्य असते. पण बऱ्याचदा समृद्ध समाजाला अशा चमत्कारातून चेतना मिळण्याऐवजी त्यांच्या ठिकाणी अंधश्रद्धा बळावताना दिसते. संतांचे जीवनदर्शन घडविताना सुद्धा केवळ चमत्कार हे त्यांचे साध्य नव्हते तर साधन होते, याचे भान राखावे. म्हणून फक्त तो त्यांच्या जीवनातील एक चमत्काराचा भाग समजावा. फार तर त्याचा सरळ सरळ अर्थ घेणे योग्य नाही. याबाबत असे म्हणता येईल की माधवबुवा धार्मिक व सहिष्णुवृत्तीचे होते.**

काळेश्वरावर त्यांची निस्सीम श्रद्धा व भक्ती होती. सात मुले एका मागोमाग गेली परंतु आठवा मुलगा गोरोबा जिवंत राहिला. म्हणून माधवबुवांना तो आपल्या श्रध्देचा, भक्तीचा, महिमा वाटला. यावरुन एवढाच तर्क करता येतो किंवा अंदाज बांधता येतो की, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत गारोबांचा जन्म झाला आहे. माधवबुवांना आठ मुले झाली, पण ती जगत नव्हती. त्यांनी आपली सर्व मुले काळेश्वराजवळील स्मशानातील गोरीत पुरली होती. ती सर्व मुले जिवंत कशी झाली ? यासंबंधी एक आख्यायिका संत गोरोबा काका चरित्रामध्ये महादेव बाळाजी कुंभार यांनी सांगितली आहे. ते आपल्या चरित्रामध्ये म्हणतात, की श्री माधवबुवा तेर येथील काळेश्वराची उपासना करीत होते. पुढे कालांतराने परमात्मा पांडुरंग ब्राह्मणाचा वेष घेऊन त्यांचे घरी आले. तेव्हा खिन्न मुद्रा पाहून देवाने त्यांना विचारले, की दुःखी का ? माधबुवांनी सांगितले, की आपली आठही मुले देवाने नेली. नंतर देवाने आठ मुलांना जेथे मूठमाती दिली, ती जागा दाखविण्यास सागितले. माधवबुवांनी काळेश्वर जवळील स्मशानात नेले व देवास आठही मुले पुरलेली जागा दाखविली. देवाने सर्व मुलांची प्रेते उकरण्यास सांगितली. बुवांनी त्याप्रमाणेच केले. देवाने पाहिले व सात मुलांना आपल्या हाताच्या स्पर्शाने जिवंत करून त्यांना स्वर्गात पाठविले. नंतर आठवा मुलगा जिवंत केला. तोही स्वर्गाच्या मार्गाने निघाला. परंतु देवाने त्यास जाऊ दिले नाही. भगवंताने त्याला आपल्या हातात घेऊन माधवबुवा व रखुमाईच्या स्वाधीन केले. त्यास गोरीतून काढले, म्हणून देवाने त्याचे नाव गोरोबा ठेवले. संतश्रेष्ठ गोरोबाकाका कुंभार हे महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायातील संत होते. ते संत नामदेव व संत ज्ञानेश्वरांचे समकालीन मानले जातात. तज्ज्ञांच्या मते शा.श. ११८९ अर्थात इ.स.१२६७ साली त्यांचा जन्म झाला असावा. त्यांनी अनेक अंभग लिहिले आहेत. ते विठ्ठलाचे- पांडुरंगाचे मोठे भक्त होते. तेर नगरीत गोरोबांच्या घराण्याची परंपरा धार्मिक व सदाचारी वृत्तीची होती. तेथील काळेश्वर या ग्रामदैवतांचे त्यांचे घराणे उपासक होते. दोघे नवराबायको कुंभारकाम व काबाडकष्ट करुन आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत होते. सदाचारी, सच्छिल वृत्तीमुळे तेरगावात माधवबुवांना संत म्हणून गावकरी ओळखत होते.

गोरोबांच्या मनावर बालपणापासूनच भगवद्भक्तीचे संस्कार झाले होते. त्यांना लेखन-वाचन येत होते. संत ज्ञानदेव, संत नामदेव यांच्या पूर्वकाळात पंढरपूर हे शिव उपासकांचे- भक्तांचे केंद्र होते. अनेक शिवभक्त त्याठिकाणी आपली साधना करीत होते. ते भक्त, योगी, सिद्ध व साधकही होते. गोरोबाकाका जेव्हा जेव्हा पंढरपूरला जात, तेंव्हा त्यांना या सिद्ध पुरुषांचे दर्शन होई. त्यांच्या योगसाधनेचे त्यांना कौतुक व आकर्षण वाटे. असे करता करता गोरोबांचा प्रपंच आता परमार्थमय झाला होता. ते सकाळी उठून अंघोळ करून, देवाची पूजा करत. नंतर नामस्मरण करावे, ध्यानात पांडुरंगाचे रूप साठवून त्याला मनी-मानसी मुरवून घ्यावे आणि मग न्याहारी करून कामाला लागावे, असा त्यांचा दिनक्रम असे. दुपारचे जेवण झाल्यावर गोरोबा घराच्या ओसरीवरच्या खांबाला टेकून देवाचे नामस्मरण करीत, अभंग म्हणत विश्रांती घेत. त्यामुळे त्यांच्या चित्ताला समाधान मिळत असे. पुन्हा लगेच मोठ्या जोमाने कामाला लागत. दिवस मावळल्यानंतर हातपाय धुऊन पुन्हा घराच्या ओसरीवर एकतारीवर चिपळ्याच्या साथीने भजन सुरू होई आणि रात्रीच्या जेवण्याचेवेळी ते थांबे. रात्रीचे जेवण झाल्यानंतर पुन्हा भजन सुरु होई. शेजारपाजारची मंडळीही त्यात सामील होत असत. नंतर परमेश्वराचे नामस्मरण करीतच झोपी जात. संतशिरोमणी गोरोबाकाका पायाने चिखल तुडवित असत. त्यांचे सर्व ध्यान पांडुरंगचरणी लागलेले असे. ते जरी संसारात दंग होते; तरी विठ्ठलभक्ती आणि विठ्ठलाचे नामस्मरण हेच त्यांचे जीवन झाले होते. पांडुरंगाच्या नामस्मरणात ते आपली तहानभूक हरपून जात. स्वदेहाचे भानच त्यांना राहत नसे. संत नामदेवजी महाराज गोरोबा काकांच्या या तन्मयवृत्तीबद्दल लिहितात- प्रेमे अंगी सदा वाचे भगवंत। प्रेमळ तो भक्त कुंभार गोरा।। कालवुनी माती तुडवीत गोरा। आठवीत वरा रखुमाईच्या।। प्रेमे अंगी असे झाकुनी नयन। करीत भजन विठोबाचे।।"

एके दिवशी संत गोरोबाकाका देहभान हरपून अभंग म्हणत माती तुडवीत होते. त्यांचे सर्व ध्यान ईश्वरचरणी लागले होते. अशावेळी त्यांची बायको- संती मुलगा- मकरेंद्राला ठेवून म्हणाली- धनी, बाळावर जरा लक्ष ठेवा. घरी त्याला सांभाळण्यास कोणी नाही. असे सांगून ती पाणी आणण्याकरिता निघून गेली. गोरोबाकाका चिखल तुडवित असताना बाळ रांगत रांगत पित्याकडे गेले अन् ते खेळत खेळत बापाचा पाय धरून उभा राहण्याचा प्रयत्न करू लागले. हसत हसत पित्याच्या पायाला धरता धरता ते चिखलात पडते. गोरोबाकाका डोळे मिटून मन देवस्वरूपी एकाग्र झाले असताना त्या चिखलात त्यांचा एकलुता एक मुलगा पायाखाली आला. ते चिखलासवे मुलालाही तुडवू लागले. त्याचा व्हायचा तो



अटळ परिणाम झाला. त्याविषयी संत एकनाथजी महाराज सांगतात- "नेणेवेचि बाळ की हे मृत्तिका। मन गुंतलेले देखा पांडुरंगी।। मृतिकेसम जाहला असे गोळा। बाळ मिसळला मृतिकेत।।" अशाप्रकारे मुलाचे रक्तमांस, हाडे चिखलात मिसळली. मुलाचा प्राण ताबडतोब गेला. मुलाच्या रक्तमांसाने चिखल रंगला. परमेश्वर भक्तीत तन्मय असलेल्या गोरोबांना बाळाचा स्पर्शही जाणवला नाही. संती पाणी घेऊन घरी आली. पण तिला दारात मूल दिसले नाही. पाण्याची एक घागर डोईवर व दुसरी कमरेवर ठेवून ती सगळीकडे बाळाचा शोध घेऊ लागली. पण बाळाचा शोध कुठे लागेना! तिने गोरोबांना विचारले, धनी, आपला बाळ कुठे आहे ? परंतु गोरोबांचे लक्ष संतीकडे नव्हतेच, ते परमेश्वराच्या नामस्मरणात दंग होते. संतीने गोरोबांना खूप विचारले पण त्यांना सांगता आले नाही. शेवटी ती मनात दचकली आणि तिची नजर चिखलाकडे गेली. आपला बाळ चिखलात तुडविला गेला आहे, हे तिच्या लक्षात आले. संतीने आक्रोश सुरु केला. बायकोचा आक्रोश कानावर येताच गोरोबा ध्यानावर आले. संती रागारागाने गोरोबाला बोलू लागली. याचे संत नामदेवजी आपल्या शब्दात वर्णन करतात- "जळो हे भजन तुझे आता। डोळे असोनिया जाहलासी आंधळा। कोठोनी कपाळा पडलासी। कसाबासी तरी काही येती दया।का रे बाळराया तुडविले।" संतीच्या आकांताने मूल आपल्या पायाखाली तुडविलेले गेले आहे, हे त्यांच्या लक्षात आल्यावर त्यांना या गोष्टीचे अत्यंत वाईट वाटले. त्यांच्या अंतःकरणाला खूप वेदना झाल्या. हातून झालेली चूक दुरुस्त करता येणारी नव्हती. परंतु संतीने विठ्ठलाविषयी जे अनुद्गार काढले, त्याने ते खवळले. त्यांनी तिला हातातील चिपळ्या फेकून मारल्या आणि चाकाचे दांडके काढून मारायला धावले. त्यावेळी तिने त्यांना विठ्ठलाची आण घातली. मारता मारता ते थबकले. तिचा आकांत सुरूच होता. शेजारपाजारचे पुरुषबायका जमा झाले व गोरोबांना दूषण देऊ लागले. संती तर माझा बाळा कुठे आहे ? माझा बाळा कुठे आहे, म्हणून छाती बडवून घेत होती. हा सगळा प्रकार आता त्यांना उमजला अन् गोरोबा संतीला म्हणाले, कारभारणी, माझ्या हातून फार मोठी चूक झाली म्हणून त्यांनी आपल्या बायकोची क्षमा मागितली.

काही दिवस गोरोबा-संतीचा अबोला चालला, कोणीही कोणाशीच बोलेना चालेना! एके दिवशी संतीने असा विचार केला की, असा अबोला धरून आपला संसार कसा चालणार ? संतीला मुलाची आणि मातृत्वाची ओढ होती. उगीच आपण धन्याला विठ्ठलाची आण घातली. त्यामुळेच त्यांनी प्रपंचाविषयी विरक्ती स्विकारली, संसारापासून दूर जाऊ लागले असे तिला वाटू लागले. गोरोबा संसारात उदास राहून परमेश्वरात आणि त्याच्या नामस्मरणात अधिक एकरूप होऊ लागले. गोरोबांची संसाराविषयीची उदासीनता तिला सहन होत नव्हती. एक वंशाचा दिवा गेला, आता वंशाला दुसरा दिवा हवा. एक वर्ष होऊन गेले तरी त्यांनी संतीच्या अंगाला स्पर्श केला नाही. दुरुनच बोलणे, वागणे सुरू होते. संतीसारखी भावूक मनाची प्रेमळ, संसारी स्त्री हा दुरावा किती दिवस सहन करणार ? तिने आपल्या बहिणीलाच सवत करून घेतले. रामी ऊर्फ राणी आणि संत गोरोबाकाका यांचा विवाह आनंदात पार पडला. परंतु गोरोबांनी संतीप्रमाणे रामीलाही स्पर्श केला नाही. तिच्या हितासाठी संतीने एक युक्ती योजिली. संतीने काय करायचे ते रामीला समजावून सांगितले. एका रात्री दोघींनी मिळून त्याप्रमाणे विचार केला आणि गोरोबा दिवसभर नामस्मरण व भजन करून

**क्रमशः**

# विधवा महिलांना वेगळी ओळख कशाला ?



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**महिला सन्मानाच्या नावाखाली आज महिलांचा अवमान करून महिलांना दुय्यम समजले जात आहे. आणि आता सरकार महिलांना हिन समजून स्वतःला बुद्धिमान व नीतीवान समजत आहे. मुळात विधवा महिलेला नवीन ओळख निर्माण करण्याची गरजच काय आहे? महिलांची सामाजिक परिस्थिती जर बघितली तर संविधानाने दिलेले हक्क अधिकारही तिला फक्त नावापुरते वापरता येतात. संविधान दिलेले हक्क अधिकार आजही बहुतांश महिला स्वतः वापरू शकत नाहीत हे सत्य नाकारता येणार नाही. आणि सरकार वेगवेगळ्या योजनेच्या नावाखाली महिलांची थट्टा करत आहे.**

ही बाब खूप गंभीर आहे. जसे संविधानाने महिलांना मताधिकार दिलेला आहे परंतु महिला मताधिकार बजावताना घरातील पुरुषांनी सांगितल्याप्रमाणेच तो बजावत असतात. याचाच अर्थ तिच्या मताला पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये पाहिजे तसं महत्त्व दिले जात नाही. दुसरी गोष्ट भारतीय संविधानाने महिलांना आरक्षण दिले आणि आरक्षणाच्या माध्यमातून महिला वेगवेगळ्या पदांवरती गेल्या ग्रामपंचायत सदस्य सरपंच नगरपरिषद सदस्य अध्यक्ष जिल्हा परिषद अशा ठिकाणी आरक्षित कोट्यातून महिला निवडून जातात. परंतु वास्तवात निवडून गेलेल्या महिलां प्रत्यक्षात कारभार बघत नाहीत. तर त्यांचा कारभार त्या घरातील कर्ता पुरुष बघत असतो. हे सर्वांना माहिती आहे. बहुतांश ठिकाणी असेच घडते शासन दरबारी ह्या गोष्टी घडत असताना शासन या गोष्टीवरती दुर्लक्ष करून, स्त्रियांची थट्टा होईल, अवमान होईल, अशा बाबींवरती जास्त लक्ष का देते ? हेच समजत नाही. सर्वसाधारणपणे समाजामध्ये आजही महिलांना अनेक प्रकारच्या समस्येला तोंड द्यावे लागते. त्यावर मात्र सरकार एकही शब्द बोलायला तयार नाही. पूर्वीपासून महिलांना दुय्यम बनवून दासी बनवून, तिला फक्त उपभोगाचं साधन म्हणून मान्य केलं. भारतीय संविधानामुळे कुठे तिच्या जीवनामध्ये सुखाचा, व आनंदाचा प्रकाश आला व अस्तित्व निर्माण झाले. माणूस म्हणून ओळख निर्माण झाली. संविधानाने स्त्री पुरुष समानता दिली असतानाही धर्माच्या, नावाखाली व रूढी परंपरेच्या नावाखाली अजूनही महिलांची ओळख तिचा पेहराव दाग दागिने यावरून होते. जसे लग्न झाल्याच्या नंतर मंगळसूत्र घालणे पायामध्ये जोडवे घालणे, कपाळावर कुंकू लावून नवरा असल्याचे अविर्भावात मोठे थाटामाटा मिरवावे लागते. परंतु लग्न झालेल्या पुरुषाला कोणत्याही प्रकारचा दागिना कोणत्याही प्रकारची ओळख दिली जात नाही. हा सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे कारण येथेही फक्त महिलेला ओळख दिली जाते पुरुषांना नाही. तरीही महिला धर्माच्या आणि रूढीच्या नावाखाली महिलेलाच दुय्यम समजून मंगळसूत्र आणि पायामध्ये जोडवे घालने सन्मानाचे समजतात. परंतु खरंच या म्हणून त्यांचा सन्मान होतो की त्यांना गुलाम बनवले जाते, यावरती मात्र वैचारिक पातळीवरती चर्चा होणे गरजेचे आहे. जेव्हा महिला पतीसोबत सुखी संसाराचे जीवन जगत असते, त्यावेळेस तिला मूलभूत सुविधांची गरज असते पाणी, वस्तूंचे वाजवी दर, शिक्षण, आरोग्य या मूलभूत सुविधा तिला आवश्यक असतात. परंतु सुखी संसारामध्ये तिला वरील कोणत्याही गोष्टी सहज मिळत नाही. महिलांचा जर खरच सलमान करायचं असेल तर घरगुती वस्तूंच्या किमती कमी करणे, महिलांसाठी सर्व सुविधा नियुक्त सुसज्ज असेल हॉस्पिटल उभे करणे, महिलांना प्रसूतीसाठी विशेष असे हॉस्पिटलची सुविधा करून देणे, ह्या गोष्टी जर केल्या तर कुठेतरी महिलांचा सन्मान केल्यासारखे होईल. परंतु सरकारी प्रसूती हॉस्पिटल ची काय परिस्थिती आहे हे नव्याने सांगण्याची मुळीच गरज नाही. पती गेल्यानंतर तिचा पूर्ण आधार निघून गेलेला असतो. शासकीय मदत वेळेवर व पुरेसी मिळावी म्हणून तिला अनेक वेळा अनेक चकरा सरकारी कार्यालय भोवती माराव्या लागतात, तरीही मदत मिळत नाही. पतीच्या जाण्याने कुटुंबाची जबाबदारी, मुलांचे शिक्षण, आरोग्य व इतर मूलभूत सुविधा मिळवून देण्याची जबाबदारी त्या महिलेंवरती पडते. एकटी महिला कुटुंब सांभाळून आपल्या मुलाबाळांची काळजी कशी घेत असेल ? हा खूप गहाण चिंतनाचा विषय आहे. सामाजिक दृष्टीने आजही महिलांना समाजामध्ये उपभोगाची वस्तू म्हणून बघितल्या जाते. आणि नवरा नसल्यानंतर समाजाचे बघण्याची नजरच बदलून जाते. अशा परिस्थितीत महिलांचे जीवन जगणे किती असह्य होते त्याची वेदना फक्त त्या स्त्रीला माहिती असते. पतीच्या निधनानंतर स्त्रीकडे फक्त वासनेच्या नजरेने बघितले जाते. अशा परिस्थितीत महिला कशी राहत असेल समाजातील बोचऱ्या नजरेपासून ती स्वतःचे संरक्षण कशी करत असेल, हे त्या महिलेच्या मनालाच माहिती. एवढी बिकट परिस्थिती असतानाही सरकारला विधवा महिलांची वेगळी ओळख निर्माण करण्याची काय गरज पडली ? काय हा खरंच सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे ? की विधवा महिलांना मदत देणे हा महत्त्वाचा प्रश्न आहे ? महिला विधवा झाली पण भविष्यात महिला विधवा होऊ नये यासाठी शासन आरोग्यांवरती योग्य ते काम करून लोकांचे जीवन वाचवण्याचा प्रयत्न करेल का ? हा महत्त्वाचा प्रश्न आहे. राहीला प्रश्न महिलेचा पती गेल्यानंतर तिला गंगा भगीरथी म्हणून संबोधने मुळात ज्या माणसाला एखादी स्त्री विधवा आहे असं माहिती होते तेव्हा न कळत त्या माणसाच्या मनामध्ये थोडं का होईना परंतु त्या महिलेंविषयी नकारात्मक भावना निर्माण होते. ही सत्य परिस्थिती ना करू शकत नाही. परंतु जगण्यासाठी काय संघर्ष करावा लागतो याची जाणीव बाकीच्यांना नसते. संघर्षातून जीवन जगत जगत कुटुंबाला सांभाळून समाजातील वाईट गोष्टींचा विचार न करता ती महिला स्वतःला कसे सिद्ध करते हे त्या महिलांनाच माहिती असते. आणि पती गेल्यानंतर तिला गंगा भगीरथी म्हणायचे म्हणजे नेमके काय म्हणायचे ? हेही सरकारला माहिती नाही.



आणि विधवा महिलांना गंगा भगीरथी म्हणणे म्हणजे तिची थट्टा करणे, तिचा अवमान करणे होय. पूर्वीपासून धार्मिक ग्रंथांनी महिलांना वेगवेगळ्या बंधनात बांधून टाकून तिला उपभोगाचे साधन बनवले, आणि आज गंगा भगीरथी नाव देऊन सरकार दुसरे नवीन काय करणार आहे ? कोणतीही नदी ही माणसाची तहान भागवत असते. गंगा भगीरथी ही नद्यांची नावे आहेत, आणि गंगा भगीरथी असंख्य लोकांचे तहान भागवत आहेत. महिलेला गंगाभागीरथीमध्ये म्हणून नेमका समाजाने समाजातील वाईट विकृतीच्या माणसाला काय संदेश द्यायचा आहे ? विधवा महिला सर्वांची तहान भागवते हा महिलांचा अवमान नाही का ? सरकारने महिलांना गंगा भगीरथी म्हणुन अवमान करण्या अगोदर असा विचार करायला पाहिजेत होता आपण महिलांचा सन्मान करतो की अवमान करतो हे सरकारला कळायला पाहिजे होत. आणि मुळात महिला विधवा असो की नसो मुळात महिलांना विशिष्ट ओळख देताच कशाला ? तिला माणूस म्हणून का वागू देत नाही ? संविधानाने जर माणसाला आणि स्त्रीला समान हक्क अधिकार दिले असतील तर स्त्रीला स्त्री म्हणून वेगळी ओळख काय द्यावी ? हा महत्त्वाचा प्रश्न आहे. स्त्रीला आजही बंधनात बांधून मर्यादित केले जात आहे. आणि वरतून सरकार स्वतःची पाठ थोपटत आपण महान कार्य केल्याचे दाखवत आहे. परंतु अशा गोष्टी कदापिही पुरोगामी महाराष्ट्रामध्ये तरी जागृत महिला खपवून घेणार नाही याची पूर्ण जाणीव आहे. विधवा महिलांना आवश्यक ती मदत न करता भविष्यातील महिला कमी वयात विधवा न होण्यासाठी सरकार काही नियोजन करणार आहे का ? मूळ मुद्दे बाजूला सारून वादग्रस्त मुद्दे समोर आणून सरकार लोककल्याण व लोकविकासाच्या गोष्टी झाकून निरर्थक गोष्टीवर चर्चा घडवून आणून वेळ वाया घालत आहे. आणि यालाच विकास समजत आहे. मुळात महिलेला संविधानाने दिलेली एकच ओळख होती म्हणजे भारतीय नागरिक, आणि याच ओळखीखाली महिलांना सर्व हक्क अधिकार, मान-सन्मान, पद, प्रतिष्ठा,पैसा या गोष्टी मिळायला पाहिजेत. तिला वेगळी ओळख देण्याची कोणतीही गरज नाही. आणि समाजातील नजरा बदलतील अशी ओळख देणे तर बुद्धीला न पटणारे आहे. आठ दिवस पती कामानिमित्त बाहेर गेलेला असताना स्त्रीकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलणारी ही पुरुष प्रधान संस्कृती महिलांना गंगा संबोधनी म्हणजे महिला निराधार कमकुवत आहे, हेच दाखवून महिलेची आणि तेही विधवा महिलेची ओळख दाखवणे होय. विधवापण महिलेच्या वैयक्तिक आयुष्यासाठी व समाजासाठी खूप धोक्याचे आहे. म्हणून विधवा महिलांनी एकत्र येऊन याविरुद्ध आवाज उठवण्याचे काम करायला पाहिजेत. आणि सरकारच्या या चुकीच्या निर्णयाचा ज्यामधून महिलांची प्रतिमा मलीन होते, याला विरोध करून महिलांना एक भारतीय महिला म्हणूनच माणसं मान मिळायला पाहिजेत. यासाठी विधवा महिलांनी जागृत असणे आवश्यक आहे. मुळात महिलांना गंगा भागीरथी म्हटल्यानंतर तिच्या जीवनात काय बदल होणार आहे ? सरकारने ही विषमतेची आणि मनुवादी वृत्तीची घाण डोक्यातून काढून भारतीय संविधानाप्रमाणे वागून, भारतीय संविधानाने दिलेली ओळख कायम ठेवावी.

# प्रात्यक्षिकातून एनआयव्हीचे प्रशिक्षण

## मास्कव्दारे कृत्रिम श्वासोच्छवासाचे परिचारिकांना धडे

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** अतीव दक्षता विभागात कृत्रिम श्वाशोश्वास सुरु असलेल्या रुग्णावर काटेकोर लक्ष ठेवावे लागते. त्यासाठी आयसीयू मध्ये काम करणाऱ्या परिचारिका आणि परिचारकांना मास्कव्दारे कृत्रिम श्वासोश्वास पद्धतीचे प्रात्यक्षिकाद्वारे प्रशिक्षण त्यांना अधिक कार्यक्षम बनवू शकते असे मत शहरातील नामवंत आयसीयू तज्ज्ञांनी केले. मराठवाड्यातून आलेल्या सुमारे सत्तर परिचारिकांनी हे प्रशिक्षण घेतले.

इंडियन सोसायटी ऑफ क्रिटीकल केअर मेडिसीन (आयएससीसीएम) छत्रपती संभाजीनगर शाखेच्यावतीने नॉन इनवेसिव्ह व्हेंटीलेशन म्हणजेच मास्कव्दारे कृत्रिम श्वासोश्वास पद्धती वरील कार्यशाळेचे आयोजन पहिल्यांदाच करण्यात आले होते. आयएमए हॉलमध्ये ही कार्यशाळा आज पार पडली. आयएमएचे अध्यक्ष डॉ. यशवंत गाडे, सचिव डॉ. अनुपम टाकळकर, कोषाध्यक्ष डॉ. शेवाळे, डॉ. साधना कुलकर्णी, डॉ. श्रीकांत सहस्त्रबुद्धे, डॉ. शरद बिरादर यांच्या उपस्थितीत कार्यशाळेचे उदघाटन झाले. तोंडातून नळी टाकून कृत्रिम श्वासोश्वास दिला जातो तसेच तोंडावर मास्क लावूनही कृत्रिम श्वासोश्वास देण्याची पध्दत आहे. रुग्णांसाठी मास्क कोणत्या आकाराचा वापरायचा या पासून यंत्रणा कशी नियंत्रित कशी करायची, मॉनिटरिंग, रुग्णाचा नैसर्गिक श्वासोश्वास आणि कृत्रिम श्वासोश्वास यातील समनवय, रुग्णाची तब्बेत खालावत आहे हे कसे ओळखायचे आणि डॉक्टरांना बोलावण्याची नेमकी वेळ कोणती, आणीबाणीची परिस्थिती सक्षमपणे हाताळून रुग्णाला कसे वाचवायचे अशा अनेक महत्वाच्या मुद्द्यावर आयएससीसीएमचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत सहस्त्रबुध्दे, डॉ. योगेश लक्कस, डॉ. शरद बिरादर, डॉ. धनंजय खटावकर, डॉ. गितेश दळवी यांच्यासह शहरातील अतीव दक्षता तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. अशा प्रकारची कार्यशाळा मराठवड्यात सर्वप्रथम घेण्यात आली अशी माहिती आय एस सी सी एम चे अध्यक्ष डॉ श्रीकांत सहस्त्रबुद्धे यांनी दिली. अतीव दक्षता विभाग, शल्यचिकित्सा विभागातील वरिष्ठ परिचारिका, अतिव दक्षता विभागातील कनिष्ठ परिचारिका, नर्सिंगचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीनी या कार्यशाळेत सहभागी झाल्या होत्या. प्रथमच कृत्रिम श्वासोश्वास पध्दतीवर प्रश्नमंजुषेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेत सहभागी परिचारिकांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. कार्यशाळेस डॉ. नहुश पटेल, डॉ. अविनाश त्रिभुवन, डॉ. उमेश गवळी, डॉ. राहुल चौधरी, डॉ. अजिंक्य देशमुख, डॉ. सचिन सूर्यवंशी, डॉ. सुधीर देशपांडे यांची उपस्थिती होती.

**आशादायक चित्र - डॉ. साधना कुलकर्णी**
आधुनिक वैद्यकीय ज्ञान मिळवण्यासाठी नर्सेस आणि ब्रदर पुढे येत आहेत हा वैद्यकीय क्षेत्रासाठी खूप मोठा बदल आहे हे चित्र आशादायी आहे असे मत ज्येष्ठ डॉ. साधना कुलकर्णी यांनी उद्घाटन प्रसंगी व्यक्त केले. आयसीयू स्टाफने डॉक्टर आणि रुग्ण यांच्यात दुवा म्हणून काम करावे असे आवाहन डॉ. साधना कुलकर्णी यांनी यावेळी केले.





# थॅलेसेमिया रुग्णांसाठी रक्तदान शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** द्वारकाधीश मंदिर सात मंदीर ट्रस्ट, गुजराथी समाज विकास मंडळ व इंडियन रेड क्रॉस सोसायटी तर्फे महाप्रभुजी वल्लभाचार्य प्रकट उत्सव दिनानिमित्त गुजराथी विद्यामंदिर येथे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले. रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी द्वारकधीश मंदिर तर्फे चंदूभाई दौलताबादकर, गुजराती समाज मंडळाचे अध्यक्ष राजेश मेहता, इंडियन रेड क्रॉस सोसायटी तर्फे सचिव प्रज्वल मिठावाला, सहसचिव अनंत बोरकर, खजिनदार राजेंद्र राठोड, डॉ. सोनल मिठावाला, तर श्री सत्य साई रक्त पेढीतर्फे डॉ. महेंद्रसिंग चौहान, अरुण वाकडीकर, चरणसिंग चव्हाण, डॉ मानसी, डॉ कांचन आदी उपस्थित होते. या रक्तदान शिबिरात 42 तरुण व महिलांनी उस्फुर्तपणे रक्तदान केले.

# सिमेंट रस्ता व पुलाच्या निकृष्ट कामाची चौकशीची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** प्रादेशिक पर्यटन विभागाच्या योजनेतून वडवाळी, ता.पैठण येथील बालाजी मंदिर ते स्मशान भुमी सिमेंट रस्ता व पुलाचे काम सध्या चालु आहे. सदरील कामात व्यवस्थित सिमेंट वापरले नसल्याचे तसेच स्टीलचे प्रमाण अत्यल्प असुन थातुर मातुर पध्दतीने काम चालु आहे. तसेच इस्टीमेट नुसार सदरील काम करण्यात येत नाही. कामात सोलींग सुध्दा वापरण्यात आली नाही. तसेच क्युरींग व दबाई सुध्दा करण्यात आली नाही. केवळ पातळ थर मुरुम अथरुन त्यावर मशिनद्वारे कमी उंचीचा सिमेंट थर अथरण्यात आला आहे. या कामासाठी मोठा निधी आलेला असतांना त्या निधी नुसार काम करण्यात येत नाही. तसेच आपल्या कार्यालयाचे अभियंता यांनी सुध्दा या कामावर देखभाल केली नाही त्यामुळे ठेकेदाराने मनमानी पध्दतीने काम उरकण्याचा सपाटा लावला आहे. त्यामुळे काम खराब होत आहे. सदरील रस्त्याची लांबी व रुंदी सुध्दा कमी करण्यात आली आहे. तसेच आराखडा सुध्दा बदलण्यात आला आहे. याविषयी वडवाळी ता.पैठण येथील बालाजी मंदिर ते स्मशान भुमी सिमेंट रस्ता व पुलाच्या निकृष्ट कामाची चौकशी करुन संबधित ठेकेदारा विरुध्द कार्यवाही करुन सदरील कामाचे बिल रोखण्यात यावे अशी लेखी तक्रार उपविभागीय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम उपविभाग पैठण तथा, तहसीलदार, तहसील कार्यालय पैठण यांना १७ एप्रिल रोजी करण्यात आली असुन यावर ग्रामपंचायत सदस्य प्रभाकर पाचे, माजी ग्रामपंचायत सदस्य गणेश पवार, रामनाथ धोंगडे यांनी चौकशी व्हावी अशी मागणी केली आहे.



# बांधकाम व्यावसायिकाची ५१ लाखांची फसवणूक

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** बांधकामासाठी महापालिकेच्या परवानग्या मिळवून देण्याचे आमिषाने एका बांधकाम व्यावसायिकाची ५१ लाख ५० हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी ोंढवा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. व्यावसायिकाकडे आरोपींनी साडेतीन लाखांची खंडणी मागितल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी शफी पठाण आणि समीर पठाण (रा. पारगेनगर, कोंढवा) यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एका बांधकाम व्यावसायिकाने कोंढवा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

# ३६ लाखांचा गंडा

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** ऑनलाइन बिंगो (रोलेट) गेम खेळल्यास दुप्पट पैसे मिळतात असे आमिष दाखवून धारणगाव ता.निफाड येथील तरुणाला ३६ लाख ८० हजार रुपयांना लुबाडल्याची फिर्याद शुभम सुनील शेळके याने लासलगाव पोलिसात दिली आहे. यासंदर्भात लासलगाव पोलिसांत ५ व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. धारणगाव ता.निफाड येथील शुभम शेळके यांस गणेश दिंडे रा.नाशिक याच्या लॉटरीच्या दुकानात दिंडे व अमोल कपिले यांच्या सांगण्यावरून ऑनलाइन बिंगो रोलेट गेम खेळल्यावर दुप्पट पैसे मिळतील असे भासवून दि.२१ फेब्रुवारी २०२२ ते १४ ऑक्टोबर २०२२ दरम्यान हा गेम खेळण्यास भाग पाडले. राहुल माणिक गोतरणे व संतोष मोहन चव्हाण यांच्या फोन पे वर वेळोवेळी पैसे ट्रान्स्फर केले. यांमध्ये शुभम शेळके याचे अंदाजे एकूण ३६ लाख ८० हजार रुपये हरला आहे. दुप्पट पैसे मिळवून देण्याच्या आमिषाने ही फसवणूक झाली अशी फिर्याद शेळके याने दिली आहे. बिंगो गेम चालवणारे व हा गेम खेळण्यास भाग पाडणारे आंचल चौरासिया, रमेश चौरासिया, मुंबई, कैलास शहा, गणेश दिंडे रा.नाशिक, अमोल कपिले रा.अकोले जि.अ.नगर यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून स्थानिक गुन्हे शाखेचे हेमंत पाटील अधिक तपास करत आहे.



# गोहत्या बंदीची मागणी प्रामुख्याने मारवाडी समाजाने लावून धरली होती

## आ. लोणीकर : महाराष्ट्रात गोवंश हत्या बंदी कायदा लागू

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** महाराष्ट्रात गोवंश हत्या बंदी कायदा लागू करण्यात आला आहे. राष्ट्राचे महामहीम राष्ट्रपती यांनी या कायद्यावर स्वाक्षरी केली आहे. त्यामुळे 'गोहत्या' हा दंडनीय अपराध मानला जाणार आहे. गोहत्या करणाऱ्या गुन्हेगाराला कठोर शिक्षाही होणार आहे. गाय ही हिंदू धर्म आणि संस्कृतीचे प्रतिक मानले जाते. त्यामुळे गोवंश हत्या बंदी कायदा लागू करण्याची मागणी सातत्याने राज्यातील मारवाडी समाज करत होता.

1995 साली युती सरकारच्या काळात गोवंश हत्या बंदी कायद्याचा मसुदा तयार करण्यात आले होते. मात्र, या विधेयकात काही त्रृटी होत्या. त्यामुळे त्यात सुधारणा करण्याची शिफारस केंद्राकडून करण्यात आली होती. परंतु, 15 वर्षांच्या काळात गोवंश हत्या बंदी कायद्यावर काही अभिप्राय सरकारने दिला नाही. मात्र, महाराषट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सरकारने सत्तेवर येताच यावर आपला अभिप्राय नोंदवला. याप्रकरणी यांनी दखल घेऊन आज गोवंश हत्या बंदी कायद्यावर स्वाक्षरी केली. असे प्रतिपादन मराठवाडा वॉटर ग्रीड योजनेचे जनक लोकप्रिय लोकनेते माजी मंत्री तथा परतुर विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार बबनराव लोणीकर यांनी केले. जालना येथे



महाराष्ट्र प्रादेशिक मारवाडी संमेलन व महाराष्ट्र प्रादेशिक मारवाडी युवा मंच यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र मारवाडी समाजाचे नवे महाअधिवेशन आज छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात गुरु गणेश भवन येथील स्वर्गीय हिरालाल सेट अग्रवाल अधिवेशन नगरीत आयोजित करण्यात आले होते याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर जगन्नाथ पुरी येथील जगद्गुरु शंकराचार्य अपेक्षा आनंद महाराज आंतरराष्ट्रीय वक्त्या साध्वी पुष्पाताई शास्त्री हरियाणा केंद्रीय कृषी राज्यमंत्री नामदार कैलासजी चौधरी केंद्रीय अर्थराज्यमंत्री नामदार डॉक्टर भागवत कराड साहेब जालना जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अतुलजी सावे, खासदार गजानन कीर्तिकर अखिल भारतीय मारवाडी समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष गोविंद प्रसाद गडोदिया अखिल भारतीय मारवाडी युवा मंच राष्ट्रीय अध्यक्ष सुरेंद्र भट्टड आमदार प्रशांत बंब शिवकुमार लोहिया आमदार नारायण कुचे माजी मंत्री अर्जुनराव खोतकर जयप्रकाश मुंदडा रमेशचंद्र बंग उमेश पंचरिया घनश्याम शेठ गोयल यांच्यासह अनेक नेते उपस्थित होते. केंद्रीय अर्थराज्यमंत्री नामदार डॉक्टर भागवत कराड यांच्या शुभहस्ते या खुल्या अधिवेशनाचे उद्घाटन संपन्न झाले.

यावेळी पुढे बोलताना आमदार लोणीकर म्हणाले की राज्यातील पाणीपुरवठा व स्वच्छता खात्याचा कारभार कॅबिनेट मंत्री म्हणून आपण पाहत असताना जालना जिल्ह्याचे पालकत्व त्याकडे होतं त्यावेळी मारवाडी समाजाच्या शिष्टमंडळाने भेटून गुरु गणेश भाऊनाच्या विकासासाठी निधीची मागणी केली होती. त्यावेळी मी तातडीने तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे मागणी लावून धरली आणि गुरु गणेश भवना च्या विकासासाठी तीन कोटी 80 लक्ष रुपये निधी मंजूर करून दिला. या अधिवेशनाच्या यशस्वीतेसाठी वीरेंद्र जी धोका सत्यनारायण भारुका अग्र विभूषण सुभाषचंद्र देविदान सुनील बियाणी मनीष तवरावला यांनी विशेष प्रयत्न केले.



लिटल एंजल इंग्लिश स्कूल शाळेने वर्षभर राष्ट्रीय स्तरावरील विविध उपक्रम आणि स्पर्धांचे आयोजन केलेले आहे. कोणताही पुरस्कार मिळविण्यासाठी लक्ष केंद्रित करणे, कठोर परिश्रम आणि शिस्त असणे आवश्यक आहे, राष्ट्रीय स्तरावरील घेण्यात आलेल्या इंग्रजी ग्यान ऑलिंपियाड स्पर्धेत आत्मज वीरेंद्र जहागीरदार या तिस-या इयत्तेतील विद्यार्थ्याने सुवर्णपदक मिळविले आहे त्याबद्दल सर्व स्तरातून त्याचे कौतूक केले जात आहे.

# अजिंक्य मिटकर महाराष्ट्र राज्य युवा पुरस्काराचे मानकरी

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** महाराष्ट्र राज्य सोलार इंडस्ट्रीज उद्योजकांची महाराष्ट्र व्यापी परिषदेमध्ये कमी वयात सर्वोत्कृष्ट सोलार उद्योगात कामगिरी केल्याबद्दल महाराष्ट्र राज्य युवा उद्योजक(सोलार) ऑफ द इयर या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यामुळे कमी वयात हे उत्तुंग शिखर गाठल्याने विविध मान्यवरानी शुभेच्छा दिल्या. अजिंक्य मिटकर यांनी मेकॅनिकल इंजिनिअरिंग चे शिक्षण पूर्ण केल्यानंतर स्वतःचा व्यवसाय सुरू करावा या उद्देशाने सोलार क्षेत्रात भविष्यात स्कोप असल्याने सोलार क्षेत्रात पूर्ण परिवाराची साथीने वडिलांच्या व सर्व काकांच्या मार्गदर्शनाखाली या व्यवसायात वयाच्या अवघ्या विसाव्या वर्षी व्यवसाय करण्याची जिद्द दाखवून व्यवसायात यशस्वी भरारी घेतली आहे त्यांना या व्यवसायात पाच वर्षे पूर्ण होत आहेत सध्या त्यांची वार्षिक उलाढाल जवळपास तीन ते चार कोटी इतकी आहे सद्यस्थितीत त्यांनी छत्रपती संभाजीनगर पैठण नेवासा अंबड गेवराई पुणे इत्यादी ठिकाणी सोलार प्रकल्पाचे विविध ठिकाणी काम पूर्ण केले आहे त्यांनी हा व्यवसाय सुरू करून पर्यावरण संवर्धनास हातभार लावला.









# ग्रामसेवक संघटनेच्या जिल्हा उपाध्यक्षपदी संदीप गादेवार यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**धर्माबाद :** महाराष्ट्र राज्य ग्राम सेवक संघाचे राज्य उपाध्यक्ष श्री संजय मिरजकर यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड जिल्हा ग्राम सेवक संघाचे मानद अध्यक्ष आनंद सावंत यांच्या नेतृत्वाखाली नांदेड जिल्ह्यातील कार्यकारणी घोषित केले असून या कार्यकारीणीत ग्रामीण भागातूनगादेवार यांची जिल्हा उपाध्यक्ष पदी निवड करण्यात आली आहे. सदरील बैठकीत ग्रामसेवक संघटनेचे पदाधिकारी व सदस्य उपस्थीत होते. सर्वानुमते ही कार्यकारिणी घोषित करण्यात आली आहे. या निवडीचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. ग्रामसेवक संदीप गादेवार हे धर्माबाद तालुक्यांतील विवीध गावात गामसेवक म्हनून उत्कृष्ठ कार्य केले आहेत.



# वडोद बाजार येथे वाळू माफियांचा धुमाकुळ सुरूच

## गिरजा नदी पात्रातील ट्रॅक्टरच्या सहाय्याने जोमाने उपसा

आधुनिक केसरी न्यूज

रमेश दनके

**वडोद बाजार :** फुलंब्री तालुक्यातील वडोद बाजार येथील वाळू माफियांचा धुमाकुळ सुरू व रात्रीच्या वेळी गिरजा नदीपात्रामध्ये वाळू माफियांचा पोळा फुटत आहे रात्रीच्या वेळेस गिरजा नदी पात्रातील ट्रॅक्टरच्या सहाय्याने जोमाने उपसा सुरू आहे गिरजा नदीपात्रामध्ये शेतकऱ्यांच्या विहिरीची पाण्याची पातळी खोल गेली असून वडोद बाजार येथील शेतकरी अशपाक जुलफेकार बेग, वडोद बाजार गट नंबर 200 मधील शेती व विहीर गिरजा नदी पात्रातून लागून असून त्यांच्या शेती व विहिरीच्या बाजूला वाळू माफिया गिरजा नदीपात्रातील रोज रात्रीच्या वेळी बेसुमार वाळू उपसा करत असून यावर संबंधित महसुली विभाग पोलीस स्टेशन यांचा कानाडोळा आहे की काय असा प्रश्न शेतकऱ्यांमधून निर्माण झाला आहे, त्यामुळे वाळू माफिया चे धाबे दणाणले असून वाळू माफियाला अच्छे दिन आलेले असून वाळू माफियावर कारवाई कोण करणार असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांमध्ये पडला आहे तरीसुद्धा वरिष्ठ अधिकारी यांनी वाळू वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर वर वाळू उपसा करणाऱ्या वाळू माफियावर कारवाईची मागणी होत आहे.





# दत्त मंदिरावर अखंड हरिनाम सप्ताह सुरू

आधुनिक केसरी न्यूज

**वडोद बाजार :** फुलंब्री तालुक्यातील वडोद बाजार येथील दत्त मंदिर संस्थान येथे पाच दिवसीय अखंड हरिनाम सप्ताह सुरू असून मंगळवारी या अखंड हरिनाम सप्ताह काल्याचे किर्तन होऊन समाप्ती होणार आहे सोमवारी ह भ प कुमारी सिद्धेश्वरी ताई सणांचे या बाल कीर्तनकार यांचा कीर्तन होणार आहे तर 18 एप्रिल रोजी मंगळवारी भागवताचार्य श्री उद्धव महाराज कोरडे यांचे काल्याचे किर्तन अकरा वाजता होणार आहे त्यानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम होणार असून भाविकांनी याचा लाभ घ्यावा असे आव्हान अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजक रामभाऊ काटकर दत्त मंदिर संस्थान यांच्यावतीने करण्यात आले आहे वडोद बाजार येथील ह भ प रामभाऊ महाराज काटकर यांच्या रानमळ्यात असलेल्या दत्त मंदिर संस्थान असून या ठिकाणी पाच दिवसीय अखंड हरिनाम सप्ताह सुरू आहे या खंड हरिनाम सप्ताह भाविक येत असून मंगळवारी या अखंड हरिनाम साप्ताह शेवट होणार आहे महंत 1008 महामंडलेश्वर योगीराज दयानंद महाराज शेलगाव यांनी रविवारी या दत्त मंदिर संस्थान येथे सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह भेट दिली यावेळी दत्त मंदिर संस्थांचे ह भ प. रामभाऊ काटकर महाराज आदीसह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भीमजयंतीनिमित्त माळीवाडा येथे अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**माळीवाडा :** ग्रामपंचायत कार्यालय माळीवाडा तालुका जिल्हा औरंगाबाद येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या 132 व्या जयंतीनिमित्त जिल्हा परिषद सदस्य कलीम पटेल सरपंच अनिता सुधाकर हेकडे व उपसरपंच कडूभाऊ कीर्तीकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले यावेळी ग्रामपंचायत सदस्य प्रवीण भाऊ बर्डे कृष्णा भाऊ मुळे मनीष भाऊ गाजरे ग्रामपंचायत सदस्य जिजाबाई भगत मंदाकिनी कीर्तीकर कमलबाई आस्वार शालेय समिती अध्यक्ष नंदकिशोर मुळे पोलीस पाटील प्रमोद साठे गावातील प्रतिष्ठित नागरिक अण्णा जाधव कैलास साठे रावसाहेब गाजरे मधुकर सातपुते शिवाजी आस्वार नामदेव धनायत संदीप शिरसाठ सूर्यकांत सरोदे एकनाथ शिरसाठ अंगणवाडी ताई आशाताई शिक्षक वृंद सर्व ग्रामपंचायत कर्मचारी आदी उपस्थित होते..



# पत्रकार संघाच्या गुजरातमधील अधिवेशनाला सहकार्य करणार : खासदार सी.आर. पाटील

## भाजप प्रदेशाध्यक्षांकडून महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या कामाचे कौतुक

आधुनिक केसरी न्यूज

**सुरत :** महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या दैनंदिनी आणि दिनदर्शिकेचे प्रकाशन गुजरात भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सी.आर. पाटील, आमदार संगीता आर.पाटील आणि आमदार संदीपभाई देसाई यांच्या प्रमुख उपस्थितीत सुरत येथे झाले. यावेळी पत्रकार संघाच्या सर्वदूर कामाचे कौतुक करुन राज्यस्तरीय अधिवेशन गुजरात येथे व्हावे यासाठी आपण पूर्ण सहकार्य करू अशी ग्वाही मान्यवरांनी दिली. पत्रकार संघाचे गुजरात प्रदेशाध्यक्ष रविंद्र बी. पाटील, संपर्कप्रमुख रमजान मन्सुरी यांनीही अधिवेशन घेण्याचा मनोदय व्यक्त केला. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या दैनंदिनी( डायरी ) आणि दिनदर्शिकेचे विमोचन सुरत येथे भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सी.आर.पाटील यांच्या उपस्थितीत झाले. यावेळी आमदार श्रीमती संगीता आर.पाटील, आमदार संदीपभाई देसाई यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी पत्रकार संघाच्या विविध उपक्रमांचे कौतुक करुन पाटील यांनी गुजरातमध्येही मोठ्या प्रमाणावर मराठी भाषिक पत्रकारांसह वेगवेगळ्या माध्यमात पत्रकार काम करतात. या सर्वांचे प्रश्न सोडवण्याच्या दृष्टीकोणातून राज्यस्तरीय अधिवेशनाच्या इच्छेला पूर्ण सहकार्य करण्याची ग्वाही दिली. तर पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, राज्य संघटक संजय भोकरे, महासचिव डॉ. विश्वास आरोटे, प्रसिद्धी प्रमुख नवनाथ जाधव, दिल्ली संपर्क प्रमुख रघुनाथ सोनवणे यांनी पत्रकार संघाच्या माध्यमातून कोविड काळात आणि इतर वेळी पत्रकारांच्या समस्या सोडवण्यासाठी केलेले प्रयत्न अडचणीच्या काळात पत्रकारांना दिलेला मदतीचा हाथ याबाबत मान्यवरांनी समाधान व्यक्त केले. पत्रकार संघाचा विस्तार महाराष्ट्रासह गुजरात, गोवा, दिल्ली या राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर आहे. सर्व ठिकाणी संघाच्या पदाधिकाऱ्यांनी आपल्या जनसंपर्क कामातून काम करणाऱ्या पत्रकारांना आधार देण्याची भूमिका घेतली आहे. गुजरात संपर्क प्रमुख रमजान मन्सुरी, प्रदेश प्रमुख रविंद्र बी. पाटील, उपप्रमुख निरव मुंशी, महामंत्री श्री संजय मिसाळ, यांनी गुजरात मध्ये पत्रकार संघाचे भव्य अधिवेशन घेण्याचा मनोदय व्यक्त करुन त्यादृष्टीने प्रयत्न चालवले आहेत.

**गोवा येथेही दिनदर्शिकेचे विमोचन**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे गोवा संपर्क प्रमुख शिवाजी नेहे यांच्या पुढाकारातून समर्थ गडावरील श्री स्वामी मठाचे अध्यक्ष श्री जयश नाईक, मुख्य पुजारी श्रीकांत कुलकर्णी, विठ्ठल मंदिर पणजीचे अध्यक्ष संतोष भांजी यांच्या उपस्थितीत पत्रकार संघाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले . यावेळी पत्रकार संघाचे पणजी येथील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते .

# महापुरुषांना जाती-पातीच्या पिंजऱ्यात बंदिस्त करू नका : पोलीस अधीक्षक लांजेवार

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** देशातील थोर समाजसुधारक यांनी संपूर्ण मानव जातीसाठी कल्याण कारक कामे केली,तसेच देशातील थोर वीरांनी, वीर व्यक्तींनी देश हित,संपूर्ण मानव जातीचे हित जपून कल्याणकारी राज्ये केली. अशा थोर समाज सुधारकाना व वीर पुरुषांना कोणत्याही समुदायाने जाती-पातीच्या पिंजऱ्यात न अडकवता त्यांच्या जयंती किंवा पुण्यतिथी यात संपूर्ण मानव जातीला सहभागी करून घ्यावे व उत्सव साजरे करावे असे वक्तव्य छत्रपती संभाजीनगर जिल्हा (ग्रामीण) चे अप्पर पोलीस अधीक्षक सुनील लांजेवार यांनी रविवार(ता,१६)रोजी येथील वैजीनाथ जेष्ठ नागरिक संघाने आयोजित कार्यक्रमात छत्रपती शिवाजी महाराज व डॉ,बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन चरित्रावर व्याख्यान देताना केले,ते पुढे म्हणाले ।की,न्यायाचे राज्य म्हणजे हिंदवी राज्य होय,यांचा पाया बालशिवाजी व राजमाता जिजाऊंनी रचला, विश्वरत्न डॉ,बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी बोलताना ते म्हणाले की, डॉ,आंबेडकर यांनी घटनेतच स्वातंत्र्य ,समता, बंधुता ही त्रिसूत्री नमूद करून देशातील सर्वांना समान लेखले,प्रथम भारत माता,महात्मा बसवेश्वर, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना अभिवादन करण्यात आले,खरा तो एकची धर्म प्रार्थना सादर करण्यात आली, वैजीनाथ जेष्ठ नागरिक संघ अध्यक्ष प्रकाश शेठ बोथरा, उपाध्यक्ष रवींद्र आप्पा साखरे, बबन क्षीरसागर, अशोक धसे, संपत डोंगरे, सुरेश संत, मुकुंद दाभाडे, बाबासाहेब गायकवाड भगवानसिंह राजपूत यांनी मान्यवरांचे स्वागत केले. सचिव ठा,धोंडीरामसिंह राजपूत यानी प्रास्ताविक व सूत्र संचलन केले,व्यासपीठावर माजी नगराध्यक्ष बाळासाहेब संचेती, माजी उपनगराध्यक्ष अकील शेख, गटविकास अधिकारी एच.आर. बोयनार, सपोनि संजय लोहकरे उपस्थित होते.



# पाल येथील गुटखा किंग पोलीसांच्या जाळ्यात

## वडोद बाजार पोलीस स्टेशनचे सपोनी विलास मोरे यांची धडक कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** १४ एप्रिल रोजी सर्वत्र भिमजयंती मिरवणुकीची धाम - धुम सुरू असतांना स.पो.नि. विलास मोरे स्टाफसह पेट्रोलींग करत असतांना ममनाबाद येथे महाराष्ट्र शासनाने बंदी घातलेला गुटका व सुगंधी सुपारीची अवैध्य वाहतूक करतांना मिळून आला. वडोद पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वडोद बाजार पोलीस ठाणे हद्दीत १४ एप्रिल रोजी सर्वत्र भिमजयंती मिरवणुकीची धाम - धुम सुरू असतांना स .पो .नि . विलास मोरे स्टाफसह पेट्रोलींग करत असतांना ममनाबाद येथे महाराष्ट्र शासनाने बंदी घातलेला गुटका व सुगंधी सुपारीची अवैध्य वाहतूक करताना मिळून आला .इसम नामे ज्ञानेश्वर संपत जाधव ( वय 36 वर्ष ) रा.पाल ता. फुलंब्री, जि.छत्रपती संभाजीनगर हा मोटार सायकल वरून अवैध विक्री साठी घेऊन जात असतांना त्याच्या कडे अंदाजे 30,000/- रू किंमतीच्या गुटख्याच्या मुद्देमाला सह मोटर सायकलवर पकडले जातांना मिळून आला . पोहेकॉ/निवृत्ती मदने यांचे फिर्यादीवरून सदर इसम इसम नामे ज्ञानेश्वर संपत जाधव ( वय 36 वर्ष ) रा.पालता.फुलंब्री,जि.छत्रपती संभाजीनगर याच्या विरूध्द कलम 188,272,273,328 भादवीप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून सदरची कामगीरी मा.पोलीस अधिक्षक श्री. मनिष कलवानिया साहेब,अपर पोलीस अधिक्षक श्री.सुनिल लांजेवार साहेब, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री.जयदत्त भवर साहेब यांचे मार्गदर्शनाखाली पुढील तपास सपोनि विलास मोरे हे करत आहे ही कामगिरी सपोनि विलास मोरे, सपोउपनि जिवरग,पोहेकॉ निवृत्ती मदने,पोकॉ गजानन डोईफोडे यांनी पार पाडली .



# डॉ. आंबेडकर यांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** येथे महामानव भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त फुलंब्री तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने अभिवादनाचा कार्यक्रम सकाळी १०:०० वाजता पार पडला या प्रसंगी उपस्थित काँग्रेस पार्टी जिल्हाध्यक्ष मा. आमदार डॉ. कल्याणराव काळे साहेब, जिल्हा उपाध्यक्ष नितिन देशमुख, प्रदेश काँग्रेस सदस्य सुदाम भाऊ मते, काँग्रेस कमिटी तालुका अध्यक्ष संदिप भाऊ बोरसे, युवक काँग्रेस जिल्हा अध्यक्ष वरुण भैया पाथ्रीकर, ज़िला वॅकेचे मा. संचालक पुंडलिक जंगले, शहराध्यक्ष मुद्दसर पटेल, राहुल सोनवणे, विजय मोरे, राजु प्रधान, मुकेश चव्हाण, विजय जाघव, युवक शहराध्यक्ष प्रशांत नागरे, जे पी शेजुळ, भगवान गंगावणे, उमेश दुतोंडे, सुरेश मुळे, हाफीज मन्सुरी, देवराव राऊत, जनार्दन तुपे, पत्रकार रउफ शेख, संजय मोरे, दामु आन्ना पाथ्रे व इतर मान्यवर उपस्थित होते.



# वानेगाव येथे भीमजयंतीनिमित्त शालेय साहित्य वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :**वाणेगाव येथे मातंग समाजाच्या वतीने होत असलेल्या क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती निमित्त जिल्हा परिषद शाळा वाणेगाव येथे क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती वाणेगाव च्या वतीने शालेय साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समिती फुलंब्री चे माजी उपसभापती सुभाष अण्णा गायकवाड, शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष काशिनाथ दादा जाधव, माझी सरपंच वाणेगाव रेलगाव ग्रुप ग्रामपंचायत च्या वैशालीताई चोपडे, जिल्हा परिषद शाळा वाणेगावचे मुख्याध्यापक तरटे सर व शिक्षक चव्हाण सर, उत्सव समिती अध्यक्ष वानेगाव चे सुभाष शेजवळ उपाध्यक्ष सागर शेजवळ, शालेय समिती अध्यक्ष अरुण गायकवाड , अंगणवाडी सेविका कांचन शेजवळ , छायाबाई शेजवळ, मंगेश सोटम, ग्रामस्थ, उत्तम सोटम, सुरेश शेजवळ, गणेश शेजवळ, संतोष सोटम, ज्ञानेश्वर चोपडे समितीचे सर्व पदाधिकारी सुरज जगधने, सुरज शेजवळ, आकाश शेजवळ, रोहित शेजवळ, सुरेश शेजवळ, जगदीश शेजवळ, गणेश निकम, शेखर शेजवळ, शुभम शेजवळ, सामाजिक कार्यकर्ते विनोद कसारे,अमोल भाऊ माहोरे आदी उपस्थित होते.



# डॉ. आंबेडकर यांना वडोद ग्रामस्थांतर्फे अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**वडोद बाजार :** फुलंब्री तालुक्यात असलेल्या वडोद बाजार येथे भारतरत्न महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास ग्रामस्थांच्या वतीने पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. डॉ. आंबेडकर यांच्या 132 व्या जयंतीच्या निमित्ताने ग्रामस्थांच्या वतीने पूर्णाकृती पुतळ्यास सकाळी १० वाजता पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी वडोद बाजार पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विलास मोरे ग्रामपंचायतीचे सरपंच उपसरपंच व ग्रामविकास अधिकारी, सदस्य, रमेश पा वाघ, दादासाहेब काळे, पत्रकार हेमंत वाघ, शिवराम मस्के, कडूबा मस्के शांताराम तोरणमल, जना भाऊ शिंनगारे, साबेर पठाण गोविंद पांडेजी, शेख रजाकभाई , शेख राजिक, मिर्झा बेग, भाऊसाहेब जाधव, अरुण वायकोस, संजय वाघ, राधाकिसन कोलते, गणेश वाघ शुभम गंगावने, आजिनाथ वाघ, काशिनाथ वाघ, श्याम दुधे, प्रफुल शिंदे, राजिक शेख सचिन तोरणमल, कडूबा नवतुरे, प्रभाकर जाधव, दगडू हिवराळे, सचिन भिवसने, शामराव हिवराळे यांच्या सह यावेळी ग्रामस्थ उपस्थित होते0

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर